मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १८९ ■ गुरुवार, १९ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

## प्लीझंट इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन साजरे




**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** नेरेपाडा येथील प्लीझंट इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, अंकन कुमार सहा, अनंता गडगे, सरपंच प्रकाश घाडगे, हनुमान खुटले, एडवोकेट विजय हरळकर, प्रकाश बिनेदार, धीरेंद्र ठाकूर, मयूर गडगे, माजी उपसरपंच वंदना रोडपालकर, धनश्री खूटले, महेश पाटील, मयूर गडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली कला कौशल्य सादर केली. अनेकांनी गाण्यांवर नृत्य करत उपस्थितांची मने जिंकली. यावेळी संदेश गायकवाड कोकण कला व शिक्षण संस्था तसेच डॉक्टर वैभव खुटले यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. शाळेचे चेअरमन रायगड भूषण धनंजय खुटले आणि प्रिन्सिपल श्रद्धा ठाकूर यांनी उपस्थित पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थी तसेच पालकांना बक्षीसे वाटप करण्यात आली.






# आज स्वागत यात्रांचा मुंबईभर जल्लोष

## गिरगाव, कुर्ला, दादर येथे चित्ररथ, खेळांची पर्वणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** प्रतिवर्षाप्रमाणे गुढीपाडव्यानिमित्त मुंबईच्या विविध भागात जोरदार नववर्ष स्वागत यात्रा निघणार आहेत. गिरगाव, कुर्ला, दादर, वरळी येथे स्वागतयात्रांची तयारी जोरदार सुरू आहे.

चैत्र शुद्ध प्रतिपदा शालिवाहन शके १९४८ रोजी गिरगावातील फडके श्रीगणपती मंदिरापासून हिंदू नववर्ष स्वागत यात्रा अर्थात गिरगावचा पाडवा मोठ्या जल्लोषात साजरा केला जाणार आहे. स्वामी विवेकानंद युवा प्रतिष्ठान आयोजित यात्रेचे हे २४ वे वर्ष आहे. सर्व भारतीयांच्या हृदयभाषेतील मंत्र म्हणजेच वंदे मातरमच्या १५० व्या वर्षानिमित्त 'वंद्य वंदे मातरम' अशी यंदाच्या यात्रेची वैशिष्ट्ये आहेत.

यात्रेचा प्रारंभ सकाळी ८ वाजता वि. प. मार्ग, गिरगावच्या फडके श्रीगणपती मंदिरापासून राज्याचे सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा आणि महापौर रितू तावडे यांच्या हस्ते गुढीपूजनाने होईल. ठाकूरद्वार नाका येथे आयोजित केलेल्या संकल्प सभेत चाणक्य मंडळ परिवाराचे अविनाश धर्माधिकारी आणि सुप्रसिद्ध गायक आणि संगीतकार पद्मश्री शंकर





महादेवन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित असतील.

**अंधेरीचा पाडवा जल्लोषात साजरा होणार**

अंधेरी (पूर्व) येथे हिंदू नववर्षाचे स्वागत अत्यंत उत्साहात व पारंपरिक पद्धतीने करण्यात येणार आहे. यंदा प्रथमच 'अंधेरीचा पाडवा' या नावाने भव्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने ३५ गुढ्या उभारून नववर्षाचे स्वागत केले जाणार असून, आकर्षक व भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

**कुर्ल्याच्या स्वागतयात्रेमध्ये यंदा 'स्वदेशी'चा जागर**

हिंदू नववर्ष स्वागतयात्रा समिती, कुर्ला पश्चिमच्या नववर्ष स्वागतयात्रेमध्ये यंदा 'स्वदेशी'चा जागर करण्यात येणार आहे. टाळ-मृदूंग, लेझिम पथक आणि ढोल ताशांच्या गजरात निघणाऱ्या या नववर्ष स्वागतयात्रेत कुर्ला येथील नागरिक पारंपरिक वेशभूषेत सहभागी होणार आहेत. यंदाच्या स्वागतयात्रेत चित्ररथ, जिवंत देखावे, फलक इत्यादी माध्यमांतून स्वदेशी जीवनशैलीचे महत्त्व सांगण्यात येणार आहे. भारतीय वातावरणाला अनुसरून पारंपरिक वेशभूषेचे महत्त्व दिले जाईल.

**गोरेगावमध्ये शोभायात्रा व पालखी सोहळा**

गोरेगावच्या श्री मंगलमूर्ती गणेशभक्त मंडळातर्फे गुढीपाडवानिमित्त 'भव्य शोभायात्रा व श्रीं'चा पालखी सोहळा आयोजित केला आहे. सकाळी ६.३० वाजता श्रींची आरती व ६.४५ वाजता पालखी प्रस्थान सुरू होईल. या शोभायात्रेत वेषभूषा, दिंडी, झांज पथक, लेझीम व पारंपरिक लोककला सादर होणार आहेत. हा कार्यक्रम सकाळी ८ ते १० वाजेपर्यंत प्लॉट क्र. ५, ५/१ व



अलंकार व्यापारी संकुल या मुख्य चौकात सादर केले जाणार आहे. सोहळ्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्वांनी पारंपरिक पोशाख परिधान करावा, अशी विनंती श्री मंगलमूर्ती गणेशभक्त मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.




# महाराष्ट्र शासन व सिडको यास सर्वोच्च न्यायालयाचा दणका !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** सर्वोच न्यायालयाने आज दिनांक १६/०३/२०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयास मान्यता देऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळकरीता जमिनीचे केलेले संपादन बेकायदेशीर असून कायद्याच्या तरतुदी प्रमाणे नसल्यामुळे भूसंपादन रद्द करत महत्वाचा निर्णय दिला आहे.

मौजे वहाळ तालुका पनवेल जिल्हा रायगड येथील जमिनीचे संपादनाविरुद्ध श्री. अविनाश धावजी नाईक व इतर यांनी मुंबई उच्च न्यायालय येथे २०१७ साली याचिका वकील सचिन पुंडे रा. पनवेल व वकील कौस्तुभ पाटील रा. उरण यांच्या मार्फत दाखल केली होती. सदर शेतकऱ्यांनी सदरची याचिका महाराष्ट्र शासनाने व सिडकोने २०१३ च्या नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार २०% विकसित भूखंड न दिल्यामुळे दाखल केली होती. सदर शेतकऱ्यांनी २०१३ च्या नवीन कायद्याच्या तरतुदीनुसार संपादित जमिनीचा चालू बाजारभाव प्रमाणे मोबदला व २०% विकसित भूखंड मिळावे या करिता महाराष्ट्र शासन व सिडकोकडे मागणी केली होती. सदर मागणीचा विचार न करता व त्यांची बाजू न ऐकता जमिनीचे संपादन केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने सदरचे भूसंपादन रद्द करून सदर जमिनीवर वितरित केलेले भूखंड देखील रद्द केले व शेतकरीच जमीन मालक आहेत असे घोषित केले.



ॲड.कौस्तुभ धनंजय पाटील उरण नविमुंबई

सदरच्या निकालामुळे आता शेतकऱ्यांना जमीन संपादनाकरिता जमिनीचा आर्थिक मोबदला तसेच २०% विकसित भूखंड मिळणार आहेत. यामुळे सिडकोच्या २२.५% योजने बाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. सदर २२.५% योजने मध्ये फक्त १६.७५% भूखंड वितरित करण्यात येतो व संपादित जमिनीकरिता कोणताही आर्थिक मोबदला दिला जात नाही. त्यामुळे नवीन भूसंपादन कायदा २०१३ प्रमाणे संपादित जमिनीचा चालू बाजार भाव प्रमाणे मोबदला व २०% विकसित भूखंड निश्चितच शेतकऱ्यांकरिता फायदेशीर ठरणार आहे.

# नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेला इक्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता

## विदर्भातील नवउद्योग परिसंस्था अधिक मजबूत

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** विदर्भातील नवउद्योग (स्टार्टअप) परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी त्यांच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरसाठी दोन दिवसीय धोरणात्मक कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत राज्यभरातील इन्क्यूबेशन सेंटर प्रमुख, शैक्षणिक संस्था तसेच परिसंस्थेतील विविध घटक सहभागी झाले.



या कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी आणि नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था यांच्यात सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. यामुळे भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर यांना अधिकृतपणे महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटर म्हणून मान्यता देण्यात आली. या धोरणात्मक समावेशामुळे विदर्भातील नवोपक्रम, उद्योजकता आणि नवउद्योगांच्या वाढीस मोठी चालना मिळणार आहे. कौशल्य, रोजगार, उद्योजकता नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी राज्यात मजबूत व सर्वसमावेशक नवउद्योग परिसंस्था उभारण्याबाबत शासनाची कटिबद्धता अधोरेखित केली. अशा संस्थात्मक सहकार्यांमुळे नवउद्योगांना योग्य मार्गदर्शन, साहाय्य व संधी उपलब्ध होऊन प्रादेशिक विकासास हातभार लागेल, असे त्यांनी नमूद केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी प्रारंभिक टप्प्यातील नवोपक्रमकर्त्यांना साहाय्य देण्यासाठी संस्थात्मक क्षमता वाढ महत्त्वाची असल्याचे सांगितले. जिल्हा व स्थानिक पातळीवर नवोपक्रम विकसित करण्यासाठी सक्षम इन्क्यूबेशन प्रणाली आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील यांनी सांगितले की, राज्यात २९ सहाय्यित इन्क्यूबेशन सेंटरचे मजबूत जाळे उभे करण्यात आले असून ते नवउद्योगांना कल्पनांपासून विस्तारक्षम उपक्रमांपर्यंत पोहोचण्यास मदत करत आहेत. तसेच इन्क्यूबेशन सेंटरनी परस्पर ज्ञान, कौशल्य व संधींची देवाणघेवाण करत सहकार्यपूर्ण परिसंस्था निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.या कार्यशाळेत इन्क्यूबेशन पद्धती अधिक सक्षम करण्याबरोबरच दीर्घकालीन शाश्वततेवरही भर देण्यात आला. अटल नाविन्यता मिशनचे माजी संचालक आणि नीति आयोगाचे अतिरिक्त सचिव रमणन रमणाथन, आयएसबीएचे अध्यक्ष प्रसाद मेमन यांच्या सत्रांमध्ये इन्क्यूबेशन सेंटरची आर्थिक, कार्यात्मक व धोरणात्मक शाश्वतता सुनिश्चित करण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या इन्क्यूबेशन केंद्रामध्ये नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्थेचा समावेश झाल्यामुळे विदर्भातील नवउद्योजकांना मार्गदर्शन, उद्योगसाखळीशी जोडणी आणि नवोपक्रम साहाय्य अधिक प्रभावीपणे उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे इच्छुक उद्योजकांसाठी नव्या संधी निर्माण होऊन महाराष्ट्राची देशातील अग्रगण्य नवउद्योग केंद्र म्हणून ओळख अधिक बळकट होणार आहे.

# अंजनीमाता शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या सहाव्या मोफत वाचनालयचा होणार विद्यार्थांना फायदा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** अंजनी माता शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तसेच भिनार गावचे पोलीस पाटील हरेश कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून कै.विश्वनाथ तांबोली यांच्या स्मरणार्थ कामोठ्याचा विघ्नहर्ता मंडळ वाचनालय सह्याद्री विद्यालय टेंभुर्ली येथे मोफत वाचालय सुरू करण्यात आले.ही संस्थेची सहावी शाखा आहे.100 वाचनालय सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे. टेंभुर्ली येथील शिक्षक, पालक आणि मांजरे पोलीस पाटील भरत चौधरी यांचा आग्रह होता की त्यांच्याकडे वाचनालय व्हावा.त्यासाठी



त्यांनी संस्थेकडे पाठपुरावा केला. म्हणून संस्थेने त्यांच्याकडे वाचनालय सुरू केले. वाचनालयाचे उद्धाटन उद्योजक सचिन तांबोळी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.त्यांनी सदर वाचनालय साठी मोठी आर्थिक मदत केली. संस्थेचे प्रास्ताविक सचिव जगदिश भोईर पोलीस पाटील साकुर्ली यांनी सादर केले. तर उपाध्यक्ष स्वागत विशे यांनी वाचनाचे महत्त्व काय आहे हे सांगितले. ग्रामविकास अधिकारी दीपिका परटोले, किरण जाधव,योगेश बांगर, दिपक देशमुख, प्रमोद पोंढेकर यांनी सुद्धा आपल्या भाषणातून प्रबोधन केले.प्रमुख वक्ते नवनीत जी यशवंतराव यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी जयवंत आरज,शाहू भोसले,सुमित पानसांडे, अजय पाटील, संजय पुर,अक्षय सुळे, काशिनाथ चौधरी, हरिश्चंद्र विशे,भरत डोहले, वसंत चौधरी,सुरेश चौधरी, वैभव विशे हे मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे प्रसिद्धीप्रमुख संदिप आरज,सतीश कुलकर्णी, आदिनाथ देशमुख,शाळेचे मुख्याध्यापक देशमुख सर व सर्व शिक्षक वृंद यांनी विशेष मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक पांडुरंग भेरे यांनी केले तर आभार प्रदर्शन संस्थेचे सचिव जगदिश भोईर यांनी केले.

# हॉटेलमधील बिलाच्या वादातून तरुणाचा मॅनेजरवर तलवारीने हल्ला; घटना CCTV मध्ये कैद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर ) :** पनवेल जवळील कामोठे वसाहतींमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील हॉटेलमध्ये घुसून एका तरुणाने तलवारीने हल्ला केल्याची घटना घडली आहे.ही घटना कामोठे सेक्टर-६ मधील सरोवर हॉटेलमध्ये घडली आहे . संबंधित तरुण तलवार घेऊन हॉटेलमध्ये घुसला आणि हॉटेल मॅनेजर उमेश शेट्टी यांच्या छातीवर वार केला. त्यानंतर त्याने काउंटरवरही ताबडतोब हल्ला चढवला.या अचानक




झालेल्या हल्ल्यामुळे हॉटेलमध्ये एकच गोंधळ उडाला. उपस्थित ग्राहकांनी जीव वाचवण्यासाठी धावाधाव करत पळ काढला. सदर संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एक दिवस आधी झालेल्या वादाचा बदला घेण्यासाठी हा हल्ला करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

सध्या पोलिस या प्रकरणाचा तपास करत असून आरोपीचा शोध सुरू आहे.

# भुयारी मार्गातील धोकादायक खड्ड्यामुळे होत आहेत अपघात

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** नवीन पनवेल, विचुंबे ते पनवेल रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या भुयारी मार्गात मोठा खड्डा झाल्याने अनेक छोटे-मोठे अपघात होत आहेत. त्यामुळे या भुयारी मार्गातील खड्डा बुजवण्याची मागणी प्रवासी करत आहेत. तक्का पनवेल ते नवीन पनवेल येथून पनवेल कडे जाणाऱ्या भुयारी मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. दररोज हजारो वाहने या ठिकाणाहून नवीन पनवेल ते पनवेल या ठिकाणी प्रवास करतात. मात्र नवीन पनवेल पासून पनवेलकडे जाणाऱ्या भुयारी मार्गात मोठा खड्डा झाल्याने या खड्ड्यात वाहने आदळत आहेत. काहींच्या दुचाकी तर या खड्ड्यांमुळे खाली कोसळल्या आहेत. त्यामुळे मोठ्या अपघाताची भीती व्यक्त केली जात आहे.



भुयारी मार्गात खड्डा पडल्याने वाहनांचे देखील नुकसान होत आहे. दोन दिवसांपूर्वी दोन दुचाकी या या खड्ड्यामध्ये आदळल्या आणि प्रवासी जखमी झाले. त्यामुळे येथील खड्डा बुजवावा अशी मागणी प्रवासी, वाहन चालक, नागरिक करत आहेत.

# अन्न व औषध प्रशासन तर्फे हॉटेल किराणा मिठाई विक्रेते व उत्पादन यांना करण्यात आले प्रशिक्षण व मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** खांदा वसाहत परिसरातील सर्व अन्न व्यावसायिकांना अन्न व औषध प्रशासन तर्फे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले . अन्न सुरक्षा व मानदे कायदा, २००६ व विनियमन २०११ फोस्टॅक ट्रेनिगबाबत पनवेल शहरातील हॉटेल सुरुची बॅन्क्वेट हॉल येथे प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात आले . यावेळी पदनिर्देशित अधिकारी तथा कार्यालय प्रमुख अन्न व औषध प्रशासन ( महाराष्ट्र राज्य ) नि.डी .मोहिते मोहिते व अन्नसुरक्षा अधिकारी श्री. निकम यांनी उपस्थितीत ७० व्यावसायिकांना मार्गदर्शन केले .




यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक राजू सोनी यांची उपस्थिती महत्वाची होती .तसेच हॉटेल सुरुची बॅन्क्वेट हॉलचे अनिल शेणॉय हे सुद्धा व्यासपीठावर उपस्थित होते . यावेळी केंद्रीय अन्न सुरक्षा मानदे प्राधिकरणाच्या ईट राईट Initative या उपक्रमांतर्गत अन्नपदार्थाचे सुरक्षित उत्पादन व हाताळणी याबाबत अन्नपदार्थ हाताळणाऱ्या व्यक्तींसाठी FOSTAC ट्रेनिंग घेणे आवश्यक आहे. सदर बाबत संपूर्ण माहिती www.eatrightindia.gov.in व www.fostac.fssai.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर प्रशिक्षण अन्न व औषध प्रशासन, म. राज्य प्रशासनामार्फत केंद्र शासनाचे मान्यता प्राप्त थर्ड पार्टी ऑडिटर कडून देण्यात येणार आहे. सदर बाबत केंद्रशासनामार्फत प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याची माहिती सुद्धा देण्यात आली . यावेळी उपस्थितांना नगरसेवक राजू सोनी यांनी सुद्धा उपयुक्त असे मार्गदर्शन केले .

# साहित्यलेखनात वास्तववादी लेखन आपल्याला अधिकाधिक यश आणि आनंद देत असते - साहित्यरत्न प्रा.एल.बी.पाटील

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** उरण कोकण मराठी साहित्य परिषद उरणने आपल्या विमलातलावावर दर महिन्याच्या १७ तारखेला कविसंमेलनाचा जो जागर ठेवला आहे,तेथे सादर होणा-या कविता या वास्तववादी असतात कारण तेथे उपस्थित असलेला श्रोतृवर्ग हा ज्येष्ठ नागरिक,त्यांना ते वास्तव आनंददायी होते.लेखक कवींचे लेखन वास्तववादी असावे असे मत संमेलनाध्यक्ष साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी पाले या गावी संपन्न झालेल्या १२५ व्या साहित्य संमेलनात मांडले.कोमसाप कार्याध्यक्ष



प्रदीप ढवळ यांनी कार्यक्रमाचे उद्धाटन करून आपल्या भाषणात नाविन्यपूर्ण लेखन आणि उपक्रमांची गरज आहे, हे विचार मांडून संमेलनाचे कौतुक केले. प्रास्ताविक शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे म्हात्रे यांनी केले.

यावेळी कोमसाप कार्यकारिणी सदस्य जयू भाटकर, जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, महाराष्ट्राची गझलकारा ज्योत्स्ना राजपूत, "बंडखोर पोरं"एड.गोपाळ शेळके , सुभाष कुडके,रायाप्पा माशाळे, गझलकार सिध्देश,लवेंद्र मोकल, ज्येष्ठ नागरिक प्रमुख चंद्रकांत मुकादम इत्यादी प्रमुखांची उपस्थिती होती.रामचंद्र म्हात्रे " गंध मातीचा". न.ग.पाटील यांच्या दोहे आणि मोग-याचा गंध " या तीन पुस्तकांचे प्रकाशन झाले.

जिल्ह्यातील २५ समाज सेवकांना कप्तान योगेश म्हात्रे, दिग्दर्शक वसंत चिरलेकर, आदर्श शिक्षक स.ज.पाटील, सुभाष कटकदौड इ.आणि २५ ज्येष्ठ नागरिक आणि कवीलेखकांना गौरविण्यात आले. २५ कवींच्या कवितांचा आनंद मनमुराद रसिकांनी अनुभवला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजना केणी, संपदा ठाकूर पाटील यांनी सुरेख केले. दौलत पाटील,अनिल भोईर,रमण पंडित,अनिता शिवकर, शिवप्रताप पंडित, किशोर पाटील,महेंद्र गावंड, अनंत पाटील,नरेश पाटील इत्यादी अन्य कोमसाप कार्यकर्ते स्वयंसेवकांची उत्तम बजावताने दिसले.

# घाटंजी बाजार समितीत बाहेरील कापसाची गर्दी

## अतिवृष्टीग्रस्त स्थानिक शेतकऱ्यांच्या नुकसानीचे गणित बिघडणार?

**दैनिक युवक आधार**

**महेश पेन्दोर/घाटंजी:** यावर्षी अतिवृष्टीमुळे घाटंजी तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. मात्र, सध्या बाजार समितीत कापूस विक्रीसाठी येत असताना एक वेगळीच अडचण समोर येत आहे. मराठवाडा आणि इतर शेजारील तालुक्यांमधून मोठ्या प्रमाणात कापूस घाटंजीच्या बाजारपेठेत येत असल्याने, नेमकं कोणाचं आणि किती नुकसान झालंय हे ठरवणं कठीण झालं आहे.स्थानिक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, जेव्हा बाहेरचा कापूस आपल्या तालुक्यात येतो, तेव्हा सरकारी दप्तरी कापसाची आवक जास्त दिसते. यामुळे तालुक्यात उत्पादन चांगलं झालंय असा चुकीचा समज होऊ शकतो आणि परिणामी अतिवृष्टीमुळे झालेल्या खऱ्या नुकसानीची मदत मिळण्यात अडथळे येऊ शकतात. बाहेरून येणाऱ्या मालामुळे स्थानिक शेतकऱ्यांच्या पिकाची नेमकी स्थिती आणि त्यांच्यावर ओढवलेले संकट प्रशासनाच्या नजरेतून सुटण्याची भीती निर्माण झाली आहे.बाहेरचा माल आणि स्थानिक शेतकऱ्यांचा माल याची ओळख पटवण्यासाठी ठोस यंत्रणा नसल्याने हा गोंधळ वाढत आहे. यामुळे खऱ्या बाधित शेतकऱ्याला न्याय मिळणार की नाही, असा सवाल आता विचारला जात आहे. प्रशासनाने यावर वेळीच लक्ष देऊन बाहेरील आवक आणि स्थानिक नुकसान यांचा मेळ लावावा, जेणेकरून इथल्या शेतकऱ्यांच्या हक्काची मदत त्यांना मिळेल, अशी मागणी होत आहे.

# फुफ्फुसात रक्ताची गुठळी आणि गर्भाशयात ४ किलो वजनाची गाठ; दुहेरी संकटावर तिने केली मात!

## मेडिकव्हर रुग्णालयात पल्मोनरी एम्बोलिझम व मोठ्या आकाराच्या फायब्रॉइडवर यशस्वी शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** अचानक धाप लागणे, पोटऱ्यांमध्ये तीव्र वेदना, चक्कर येऊन कोसळणे आणि बेशुद्ध होणे अशी गंभीर लक्षणे दिसल्यानंतर ५१ वर्षीय महिलेवर मेडिकव्हर हॉस्पिटल येथे तातडीने उपचार करून तिचा जीव वाचवण्यात डॉक्टरांना यश आले. रुग्णाला एकाच वेळी पल्मोनरी एम्बोलिझम (फुफ्फुसातील रक्ताची गुठळी) आणि गर्भाशयातील मोठा फायब्रॉइडसारखी दुहेरी गंभीर समस्या असल्याचे तपासणीत आढळले.

या रुग्णावर उपचार करण्यासाठी डॉ. बादल ताओरी (इंटर्नल मेडिसिन), डॉ. अनुरंजिता पल्लवी (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. धार्मिक भुवा (इंटरव्हेंशनल रेडिओलॉजिस्ट) आणि डॉ. विवेक (सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट) यांच्या बहुशाखीय पथकाने संयुक्तपणे उपचार केले.

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दिघी गावात राहणारी रुग्ण श्रीमती ओनिझा गीते हि जवळपास गेल्या आठ महिन्यांपासून आपल्या आरोग्याच्या समस्यांशी झुंज देत होती. या काळात तिचे वजन अत्यंत कमी झाले आणि तिला मासिक पाळीत वारंवार तीव्र रक्तस्राव होऊ लागला, ज्यामुळे हळूहळू रोगप्रतिकार शक्तीवर आणि दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ लागला. डॉक्टरांना भेटूनही तिच्या प्रकृतीत पाहिजे तशी सुधारणा दिसून आली नाही आणि लक्षणांची तीव्रता दिवसेंदिवस वाढतच चालली होती.

४ फेब्रुवारी २०२६ रोजी रुग्णाची प्रकृती अचानक बिघडली. घरात खाली वाकताना ती बेशुद्ध होऊन कोसळला, ज्यामुळे तिचे संपूर्ण कुटुंब अत्यंत काळजीत पडले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन, तिला तातडीच्या उपचारांसाठी प्रथम स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तिच्या प्रकृतीची गुंतागुंत लक्षात घेता, पुढील तपासणी आणि प्रगत उपचारांसाठी तिला मेडिकव्हर हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले.

रुग्णालयात नेत असताना तिला तीव्र धाप लागणे, पायात गारठल्यासारखे वाटणे, अचानक तोल जाणे आणि वारंवार उलट्या होणे यांसारखी लक्षणे दिसून आली आणि ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी रुग्णाला डॉ. बादल ताओरी यांच्या देखरेखीखाली रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेपूर्वी रुग्णाला जुलाब आणि पोटऱ्यांमध्ये सतत वेदना होत असल्याचेही तिने सांगितले. तिच्या लक्षणांची तीव्रता लक्षात घेऊन, तिला तात्काळ आयसीयूमध्ये (ICU) हलवण्यात आले. सीटी पल्मोनरी अँजिओग्राफी (CTPA) मध्ये मुख्य फुफ्फुसीय धमनीत (main pulmonary artery) एक जीवघेणा सॅडल-आकाराचा थ्रॉम्बस (रक्ताची गुठळी) असल्याचे निदान झाले, जो उजव्या आणि डाव्या दोन्ही फुफ्फुसीय धमन्यांपर्यंत पसरला होता. ही एक अशी स्थिती आहे, ज्यावर त्वरित उपचार न केल्यास ती प्राणघातक ठरू शकते. पुढील सीटी ॲबडोमेन इमेजिंगमध्ये गर्भाशयात एक मोठी लिओमायोमा (फायब्रॉइड) गाठ असल्याचे दिसून आले, ज्यात डीजनरेटिव्ह बदल झाले होते आणि ती झिफिस्टरनम (छातीच्या हाडाचा खालचा भाग) पर्यंत पोहोचली होती.

इंटर्नल मेडिसिन विभागातील डॉ. बादल ताओरी सांगतात की, जेव्हा रुग्ण रुग्णालयात दाखल झाली, तेव्हा तिला प्रचंड धाप लागत होती, तिची प्रकृती गंभीर होती. रुग्णाच्या शरीरातील ऑक्सिजनची



पातळी कमी-जास्त होत होती आणि नाडीचे ठोके वाढले होते. सीटी स्कॅनमध्ये सॅडल पल्मोनरी एम्बोलिझम दिसून आला, याचा अर्थ फुफ्फुसांच्या धमन्यांच्या मुख्य भागात रक्ताची एक मोठी गुठळी होती आणि ती दोन्ही फुफ्फुसांचा रक्तप्रवाह रोखत होती. हा पल्मोनरी एम्बोलिझमच्या सर्वात धोकादायक प्रकारांपैकी एक आहे, कारण त्यामुळे हृदयावर अचानक ताण येऊ शकतो आणि हृदयविकाराचा झटका येऊ शकतो. त्वरित आयसीयूमध्ये दाखल करत तातडीची वैद्यकीय घेण्यात आली. पल्मोनरी एम्बोलिझममध्ये अचानक धाप लागणे, छातीत अस्वस्थता, बेशुद्ध पडणे किंवा कोसळणे अशी लक्षणे दिसू शकतात. बरेच लोक पोटऱ्यांमध्ये वेदना किंवा पायात अस्वस्थता यांसारख्या सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करतात, परंतु ही लक्षणे कधीकधी रक्ताची गुठळी तयार होण्याचे संकेत देऊ शकतात. मध्यमवयीन व्यक्तींमध्ये, दीर्घकाळ हालचालींचा अभाव, हार्मोनल घटक, लठ्ठपणा, शरीरातील ट्यूमर किंवा रक्त गोठण्याचे विकार हे धोक्याचे घटक ठरु शकतात.

७ फेब्रुवारी रोजी, इंटरव्हेंशनल रेडिओलॉजिस्ट डॉ. धर्मिक भुवा यांनी फेमोरल व्हेनद्वारे (मांडीच्या शिरेद्वारे) मेकॅनिकल कॅथेटर-डायरेक्टेड थ्रोम्बेक्टॉमी, थ्रोम्बोॲस्पिरेशन आणि थ्रोम्बोलिसिस ही प्रक्रिया पार पाडली. या प्रक्रियेमध्ये, पायातील शिरेतून एक पातळ नळी घालून ती काळजीपूर्वक फुफ्फुसांच्या धमन्यांपर्यंत पोहोचवली जाते, जेणेकरून रक्ताची गुठळी यांत्रिकरित्या फोडून काढता येईल आणि त्याच वेळी गुठळी विरघळवणारे औषध थेट त्या जागी पोहोचवता येईल. पायाच्या डॉप्लर तपासणीत डीप व्हेन थ्रोम्बोसिस (गहन शिरा गुठळी) आढळून आला नाही. १० फेब्रुवारी रोजी, भविष्यात कोणत्याही गुठळ्या फुफ्फुसांपर्यंत पोहोचू नयेत यासाठी रुग्णावर व्हेनोप्लास्टी आणि इन्फ्रा-रेनल आयव्हीसी फिल्टर बसवण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली.

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अनुरंजिता पल्लवी म्हणाल्या, "हे एक गुंतागुंतीचे आणि उच्च जोखमीचे प्रकरण होते, कारण रुग्णाला केवळ फुफ्फुसातील मोठी रक्ताची गुठळीच (पल्मोनरी एम्बोलिझम) नव्हती, तर पोटात लक्षणीय जागा व्यापणारी गर्भाशयाची एक मोठी गाठ (फायब्रॉइड) देखील होती. तिचा श्वासोच्छ्वास स्थिर करणे आणि जीवघेणी फुफ्फुसातील रक्ताची गुठळी काढणे हे आमचे प्राधान्य होते. तिची प्रकृती सुधारल्यानंतर, आम्ही मूळ कारणावर उपचार केले. ओटीपोटातील मोठ्या गाठींमुळे कधीकधी शिरांवर दाब येतो आणि रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका वाढतो. काळजीपूर्वक नियोजन आणि प्रकृती स्थिर केल्यानंतर,रुग्णाला भूल देऊन दोन्ही बाजूंच्या फॅलोपियन नलिका आणि अंडाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियेसह संपूर्ण गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया (टोटल ॲबडॉमिनल हिस्टेरेक्टॉमी) करण्यात आली.

डॉ. अनुरंजिता पुढे सांगतात की,फायब्रॉइड आकाराने मोठे होते जे छातीच्या हाडापर्यंत (झिफिस्टरनम) पोहोचले होते. तीन तास चाललेल्या एका गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेद्वारे, पोटावर छेद देऊन ३० सेमी(४ किलो वजनाची) गर्भाशयातील मोठी गाठ शस्त्रक्रियेने काढण्यात आली. योग्य वेळी उपचार न केल्यास रुग्णाचा धोक्यात आला असता. अशा प्रकरणाचे अचूक व्यवस्थापन करण्यासाठी अतिदक्षता विभाग (क्रिटिकल केअर), इंटरव्हेंशनल रेडिओलॉजी आणि स्त्रीरोग विभाग यांच्या टीममध्ये समन्वयाची आवश्यकता असते. वेळीच निदान, अचूक निर्णयक्षमता आणि टिमवर्कमुळे रुग्णाचा जीव वाचला.

शस्त्रक्रियेनंतर, रुग्णावर आयसीयूमध्ये बारकाईने लक्ष ठेवण्यात आले आणि उपचारांना चांगला प्रतिसाद मिळाला. तिची प्रकृती हळूहळू स्थिर झाली, तिला १८ फेब्रुवारी जनरल वॉर्डमध्ये हलवण्यात आले आणि फिजिओथेरपी सुरू करण्यात आली. तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली करण्यात येणाऱ्या शारीरिक हालचाली आणि पुनर्वसनामुळे तिच्या प्रकृतीत सुधार दिसून आली.

डॉ. बादल ताओरी म्हणाले, यशस्वी उपचार आणि शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा दिसून आली. तिचा श्वासोच्छ्वास सामान्य झाला, हृदयाचे कार्य स्थिर झाले आणि तिला हळूहळू हालचाल करता आली. पुनरावृत्ती टाळण्यासाठी तिला रक्त पातळ करणारी औषधं सुरू करण्यात आली. फॉलोअप दरम्यान, तिच्या प्रकृतीत सुधारणा दिसून आली आणि तिने पुन्हा दैनंदिन कामांना सुरूवात केली. हल्ली ४० ते ६० वयोगटात पल्मोनरी एम्बोलिझमच्या (फुफ्फुसातील रक्त गोठण्याच्या) प्रकरणांमध्ये वाढ होत असल्याचे आढळून येते, जे अनेकदा बैठी जीवनशैली, हार्मोनल बदल, लठ्ठपणा, लांबचा पल्ल्याचा प्रवास किंवा निदान न झालेल्या ट्यूमरशी संबंधित आहे. आपला अनुभव सांगताना रुग्ण ओनिझा गीते म्हणाल्या, डॉक्टरांच्या कुशल टीमने माझ्या कुटुंबाला सतत धीर दिला आणि तात्काळ उपचार करत मला नवे आयुष्य जगण्याची संधी दिली. मी हळूहळू माझ्या दैनंदिन कामांना सुरुवात करत आहे आणि प्रकृती सुधारण्यावर मी लक्ष केंद्रित करत आहे. मला खरंच वाटतं की मला आयुष्याची दुसरी संधी मिळाली आहे.हे प्रकरण मेडिकव्हर हॉस्पिटलमधील कुशल तज्ज्ञांची टिम व उत्तम सुविधांचे उत्तम उदाहरण आहे . वेळीच निदान, चोवीस तास आयसीयू सेवा आणि विविध विभागांमधील तज्ज्ञांच्या एकत्रित प्रयत्नातून प्राणघातक धोका टाळता आला. सुरुवातीच्या लक्षणांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि तात्काळ वैद्यकीय मदत घेणे हे अनेक जीव वाचवू शकते,असे खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख, संदीप जोशी यांनी स्पष्ट केले.

---

# युद्धजन्य परिस्थितीतील 'गॅस टंचाई'वर रविराज हॉटेलचा 'गावरान' तोडगा!

## सिल्लोड-जळगाव महामार्गावर खवय्यांची गर्दी; रवींद्र खांडवे यांचा अभिनव उपप्रयोग

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** सध्याच्या जागतिक अस्थिरतेमुळे आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधनाचे दर गगनाला भिडले असून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. मात्र, या संकटापुढे हार न मानता सिल्लोड-जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील हॉटेल 'रविराज बिअर बार अँड रेस्टॉरंट' ने एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. हॉटेलचे मालक रवींद्र खांडवे यांनी गॅस टंचाईवर मात करण्यासाठी पुन्हा एकदा आपल्या मातीतील पारंपरिक 'चुली'ची वाट धरली असून, या निर्णयाचे संपूर्ण तालुक्यात कौतुक होत आहे.

**संकटाचे संधीत रूपांतर**

गेल्या काही दिवसांपासून गॅस वितरणात येत असलेल्या अडचणींमुळे अनेक हॉटेल व्यावसायिक हवालदिल झाले आहेत. अशा स्थितीत 'रविराज' हॉटेलने आधुनिकतेला पारंपरिक जोड दिली आहे. हॉटेलच्या परिसरातच मोठ्या चुली मांडून त्यावर स्वयंपाक करण्यास सुरुवात केली आहे. यामुळे केवळ गॅसवरील अवलंबित्व



संपले नाही, तर ग्राहकांना लाकडाच्या मंद आचेवर शिजलेले, अस्सल ग्रामीण ढंगाचे जेवण उपलब्ध होत आहे.

**महामार्गावर पेटली 'चुलीवरची' चव**

सिल्लोड-जळगाव महामार्गावरील हरिओम जिनिंग शेजारी असलेल्या या हॉटेलमध्ये आता प्रवाशांची पावले आपोआप वळत आहेत. मशिन्स आणि गॅसच्या युगात हरवत चाललेली चुलीवरच्या अन्नाची चव आता खवय्यांसाठी पर्वणी ठरत आहे. गॅसच्या तुलनेत चुलीवर शिजवलेले अन्न अधिक चविष्ट आणि

> **"गॅस टंचाईमुळे ग्राहकांची गैरसोय होऊ नये आणि त्यांना दर्जेदार सेवा मिळावी, हाच आमचा उद्देश आहे. चुलीवरच्या जेवणाला मिळणारा प्रतिसाद पाहून आम्हालाही समाधान वाटत आहे."**
> **— रवींद्र खांडवे (मालक, रविराज रेस्टॉरंट)**

रुचकर लागते, असा अनुभव ग्राहक व्यक्त करत आहेत.

**कोणाचाही आक्षेप नाही, केवळ कौतुक!**

रवींद्र खांडवे यांचा हा उपक्रम पूर्णपणे कायदेशीर आणि नैसर्गिक संसाधनांचा वापर करणारा आहे. व्यावसायिक संकटावर मात करण्यासाठी त्यांनी निवडलेला हा मार्ग केवळ स्वयंपूर्णच नाही, तर ग्राहकांच्या आरोग्यासाठीही हितावह आहे. जागतिक स्तरावरील इंधन टंचाईचा परिणाम आपल्या व्यवसायावर होऊ न देता, त्यांनी 'आत्मनिर्भर' होण्याचा जो मार्ग निवडला, त्याचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

---

# अंधश्रद्धेचा खिळा उपटला! सारोळा येथील वृक्षांची 'वेदनामुक्ती'

## वृक्षप्रेमी डॉ. संतोष पाटील यांचा पुढाकार; खिळे काढून वृक्षांवर केले शास्त्रीय उपचार

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** तालुक्यातील सारोळा (पीर) येथील दर्गा परिसरात अंधश्रद्धेपोटी झाडांना खिळे ठोकण्याचा (खुट मारणे) धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अंगात येणे, करणी-बाधा किंवा भानामती यांसारख्या गैरसमजातून ५ ते ६ मोठ्या वृक्षांना खिळ्यांनी अक्षरशः विद्ध करण्यात आले होते. या कृत्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत असल्याचे लक्षात येताच, वृक्षसंवर्धक तथा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह डॉ. संतोष पाटील यांनी तातडीने पुढाकार घेत या वृक्षांना खिळेमुक्त करून त्यांना जीवदान दिले आहे.डॉ. संतोष पाटील यांनी सोमवारी घटनास्थळी जाऊन झाडांमध्ये ठोकलेले सर्व खिळे अतिशय काळजीपूर्वक उपसून काढले. खिळ्यांमुळे झाडांच्या जिवंत भागाला इजा होऊन त्यांना कीड लागते आणि कालांतराने ही वृक्ष कोसळतात. हे रोखण्यासाठी त्यांनी त्या छिद्रांमध्ये 'बायो-कीटकनाशक' आणि 'वॅक्स' (मेण) भरून शास्त्रीय उपचार



केले. विशेष म्हणजे, 'महाराष्ट्र ट्री फेलिंग ॲक्ट १९६४' नुसार झाडांना कोणत्याही स्वरूपाची इजा किंवा दुखापत करणे हा कायदेशीर गुन्हा असून त्यास शिक्षेची तरतूद आहे.

**कायदेशीर इशारा : झाडांना इजा करणे हा गुन्हा**

वनविभागाच्या 'महाराष्ट्र ट्री फेलिंग ॲक्ट १९६४' नुसार, झाडांना तोडणे किंवा त्यांना कोणत्याही प्रकारे इजा पोहोचवणे (खिळे ठोकणे, फांद्या छाटणे इ.) हा गंभीर गुन्हा आहे. अशा कृतीमुळे पर्यावरणाचे

> **"आपल्या हिंदू संस्कृतीमध्ये वृक्षांना दैवत मानले जाते. त्यांनाही संवेदना आणि भावना असतात. धर्मात झाडांना खिळे ठोकण्याची कोणतीही प्रथा किंवा रीत नाही. भाविकांनी अशा अंधश्रद्धांना बळी पडू नये. जो झाडांचे रक्षण करतो, झाडे त्याचे रक्षण करतात."**
> **— बालयोगी जगन्नाथगिरी महाराज, गहिनीनाथ आश्रम, सारोळा (नाथाचे).**

> **"झाडांना खिळे ठोकल्याने त्या जखमांमधून कीड आत शिरते आणि मोठे वृक्ष कमकुवत होऊन कोसळतात. अंधश्रद्धेपोटी निसर्गाची ही हानी थांबवणे गरजेचे आहे. नागरिकांनी अशा प्रकारांना आळा घालून वृक्षसंवर्धनासाठी पुढे यावे."**
> **— डॉ. संतोष पाटील, वृक्षसंवर्धक, सिल्लोड.**

संतुलन बिघडते, ज्यामुळे संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

---

# वाढत्या चोरीच्या घटनांमुळे श्रीवर्धनमध्ये सतर्कता

## फेरीवाले व बाहेरील कामगारांची नोंदणी करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित** : शहरात अलीकडच्या काळात घरफोडी व चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्यामुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने शहरात येणाऱ्या सर्व फेरीवाल्यांची तसेच विविध वस्तू विक्री करणाऱ्या विक्रेत्यांची संपूर्ण माहिती नोंदवून घेणे आवश्यक असल्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

सध्या श्रीवर्धन शहर आणि परिसरात अनेक विकासकामे सुरू आहेत. या कामांवर कार्यरत असलेले सुमारे ९० टक्के कामगार व वाहनचालक हे बाहेरील राज्यांमधून आलेले असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने या सर्व कामगारांची व चालकांची सविस्तर माहिती संबंधित ठेकेदारांनी प्रशासनाकडे जमा करणे बंधनकारक करावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.


तसेच शहरात रोज मोठ्या प्रमाणावर फेरीवाले व विविध वस्तू विक्रेते येत असतात. त्यांच्या ओळखीची व राहण्याच्या पत्त्याची नोंद प्रशासनाकडे असणे गरजेचे असल्याचे नागरिकांचे मत आहे. यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होईल आणि चोरीसारख्या घटनांवर आळा बसण्यास हातभार लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत आणि शहरातील नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

---

# गॅस टंचाईचा ग्रामीण भागात स्फोट! 45 दिवस वेटिंग;पुन्हा चुली पेटल्या, गृहिणींचा संताप उसळला

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** आंतरराष्ट्रीय युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठा डळमळीत झाल्याचा फटका आता थेट ग्रामीण भागातील स्वयंपाकघरांना बसू लागला आहे. घरगुती गॅस सिलिंडरची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने गावागावात पुन्हा चुली पेटू लागल्या आहेत. गॅससाठी तब्बल 45 दिवस प्रतीक्षा करावी लागत असल्याने गृहिणींचा संयम सुटू लागला असून प्रशासनाच्या कारभारावर संताप व्यक्त केला जात आहे. सध्या शहरी भागात साधारण 30 दिवसांच्या आत गॅस सिलिंडर मिळत असताना, ग्रामीण भागातील ग्राहकांना मात्र 45 दिवसांपर्यंत वेटिंग असल्याचे



वास्तव समोर आले आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठा विस्कळीत झाल्याचा परिणाम ग्रामीण भागातील वितरण व्यवस्थेवर होत असल्याचे सांगितले जात आहे.

गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात घरगुती गॅसचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला होता. त्यामुळे चुलीवर स्वयंपाक करण्याची पद्धत जवळपास संपुष्टात आली होती. मात्र आता गॅस वेळेवर मिळत नसल्याने अनेक कुटुंबांना पुन्हा चुली पेटवण्याची वेळ आली आहे. त्यातच चुलीसाठी लागणारे लाकूडही सहज उपलब्ध होत नसल्याने गृहिणींची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. गृहिणी राजश्री पाटील म्हणाल्या, घरगुती गॅस सिलिंडर मिळण्यासाठी तब्बल 45 दिवस वाट पाहावी लागते. गॅस नसल्यामुळे चुलीवर स्वयंपाक करावा लागतो; पण चुलीसाठी लाकूडही मिळत नाही. त्यामुळे मोठी गैरसोय होत आहे.सामाजिक पदाधिकारी यांनीही प्रशासनावर नाराजी व्यक्त करत सांगितले की, गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलिंडर मिळण्यास प्रचंड उशीर होत आहे. ग्रामीण भागात 45 दिवस वेटिंग असल्याने अनेक कुटुंबांची मोठी गैरसोय होत आहे. दरम्यान गॅस वितरक यांनी सांगितले की, सध्या गॅस पुरवठा कमी प्रमाणात होत असल्यामुळे वेटिंग वाढली आहे. पुरवठा नियमित झाल्यानंतर ग्राहकांना वेळेत गॅस देण्याचा प्रयत्न केला जाईल. दरम्यान, उज्ज्वला योजनेतून ग्रामीण भागात गॅस जोडण्या देऊन चुली बंद झाल्याचा सरकारचा दावा असतानाच आज पुन्हा गावागावात चुली पेटू लागल्याचे चित्र दिसू लागले आहे. त्यामुळे गॅस टंचाईचा हा भडका लवकर शांत झाला नाही, तर ग्रामीण भागातील स्वयंपाकघरांमध्ये पुन्हा 'चुलीचा काळ' परत येणार का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# पवार विद्यामंदिरमध्ये 'चटकदार खाऊ गल्ली' उपक्रम उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख** : विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोन विकसित व्हावा, कामाचे नियोजन समजावे, श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण व्हावी तसेच भांडवल आणि नफा यांचे गणित प्रत्यक्ष अनुभवातून समजावे या उद्देशाने पुणे जिल्हा प्राथमिक शिक्षक संघ शिक्षण प्रसारक मंडळाच्या सौ. प्रतिभा पवार विद्यामंदिर येथे कार्यानुभव विषयांतर्गत 'चटकदार खाऊ गल्ली' या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन शिक्षक अमोल समगीर यांनी केले.

या उपक्रमाचे उद्घाटन शाळेचे माजी विद्यार्थी व सध्या हॉटेल व केटरिंग व्यवसायात यशस्वी ठरलेले पवन खोपटकर, किरण खेडेकर आणि रोहित कांदळेकर यांच्या हस्ते करण्यात आले.



कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्याम धुमाळ यांच्यासह सुनीता ढुमे, उद्धव डेरे, विठ्ठल पवार, नारायण शिंदे, नंदा कोकरे, संतोष पवार, शहाजी जगताप, भारती भोंडवे, मीनाक्षी मेमाणे, मनीषा नवले, शुभांगी राऊत, उमाकांत शेळके, शर्मिला खारतोडे, सारिका बटले, दत्तात्रय जाधव, किशोर शिंदे, भाग्यश्री भोसले, वनिता रांगडे, वैजनाथ जाधव, चौधरी तसेच अनेक पालक व व्हॅनचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी सध्याच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत केटरिंग आणि हॉटेल व्यवसायातील संधी, आव्हाने, आवश्यक कौशल्ये आणि चिकाटीचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी अनुभवांमुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यवसायाबद्दलची उत्सुकता अधिक वाढल्याचे दिसून आले.

या उपक्रमात इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांनी एकूण १८ खाऊचे स्टॉल उभारले होते. पिझ्झा, पाणीपुरी, समोसा, भेळ, वडापाव, मिसळ पाव, मंचुरियन, भजी, चनाचाट, ज्यूस, फ्रुट सॅलड, कोल्ड कॉफी, पेप्सी, सरबत अशा विविध चटकदार पदार्थांनी परिसर गजबजून गेला होता. विद्यार्थ्यांनी स्वतः नियोजन करून साहित्य खरेदी, स्टॉल सजावट, ग्राहकांशी संवाद आणि विक्री याची जबाबदारी सांभाळली.

इयत्ता पहिली ते चौथी तसेच सातवी-आठवीच्या विद्यार्थ्यांसह पालकांनीही या 'खाऊ गल्ली'ला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्वांनी विविध पदार्थांचा आस्वाद घेत "या खा, खूश व्हा" ही उपक्रमाची टॅगलाईन अक्षरशः साकारली.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सांघिक भावना, संवाद कौशल्य आणि आर्थिक व्यवहारांची प्राथमिक समज विकसित झाल्याचे शिक्षकांनी सांगितले. एकूणच 'चटकदार खाऊ गल्ली' हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि ज्ञानवर्धक ठरला.

# शिक्षक-मुख्याध्यापक सहविचार सभेमध्ये प्रबोधनाचे नरेंद्र गोंडाने यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : शिक्षक महासंघ दर्यापूर व अंजनगाव सुर्जी यांच्या विद्यमाने शिक्षक सहविचार सभा व सत्कार समारंभ तसेच १०० लक्ष रु. डिजिटल क्लासरूमचा वितरण सोहळा सन्माननीय अतिथी यांच्या उपस्थितीत नुकताच अनंत मंगल कार्यालय दर्यापूर येथे मोठ्या उत्साहात पार पडला. यामध्ये दर्यापूर येथील नामांकित प्रबोधन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे नवोपक्रमशील प्राचार्य मा. नरेंद्र गौंडाणे यांच्या कार्यकर्तृतची दखल घेऊन शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष दर्यापूर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार श्री. माननीय. गजाननभाऊ लवटे, श्री चंद्रशेखरजी भोयर(अध्यक्ष शिक्षक महासंघ) उद्धाटक म्हणून श्री डॉ. उल्हासदादा सगई तसेच अँड श्री संतोषभाऊ धर्माधिकारी(कार्यकारणी अध्यक्ष विदर्भ प्रबोधन मंडळ दर्यापूर) व इतर मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्याचे आयोजन श्री .चंद्रशेखरजी भोयर(संस्थापक अध्यक्ष शिक्षक महासंघ) यांनी केले होते. यामध्ये दर्यापूर अंजनगाव तालुक्यातील



२०. नामांकित शाळांना आमदार निधीतून १०० लक्ष रु. डिजिटल बोर्ड चे वाटप करण्यात आले. या सोहळयामध्ये प्रबोधन विद्यालयाचे श्री स्वप्निल घाटे(शहर उपाध्यक्ष) प्रा. श्री. अमोल कोरडे(तालुका प्रसिद्धीप्रमुख) तसेच श्री. विजय मुळे( शहर उपाध्यक्ष) यांना शिक्षक महासंघाच्या वतीने श्री. चंद्रशेखरजी भोयर. यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे बाहारदार सूत्रसंचालन श्री. मनोज इंदोरे यांनी केले तर सोहळ्यासाठी परिसरातील विविध नामांकित विद्यालयातील मा. अध्यक्ष. मुख्याध्यापक शिक्षकवृंद तसेच शिक्षक महासंघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. क्रांतिसिंह गहरवार) तालुका अध्यक्ष शिक्षक महासंघ अंजनगाव सुर्जी) व इतर सर्व पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.

# डोंगरगाव फाट्याजवळ भीषण अपघात; डॉ. विश्वास पालोदकर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :-** सिल्लोड-जळगाव महामार्गावर मंगळवारी (दि. १७) दुपारी २ ते २:३० वाजेच्या सुमारास झालेल्या एका अत्यंत दुर्दैवी अपघातात पालोद येथील प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. विश्वास शेषराव पालोदकर (वय ५०) यांचा जागीच मृत्यू झाला. डोंगरगाव फाट्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअप टेम्पोने (क्र. MH 48 BM 2956) त्यांच्या स्कुटीला (क्र. MH 20 FE 3284) जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, पिकअपने स्कुटीला सुमारे १०० फूट अंतरापर्यंत फरफटत नेले, ज्यात डॉक्टरांचा जागीच अंत झाला.

**नियतीचा क्रूर खेळ:**

काळाचा अघोरी घाला किती भीषण असतो, याचा प्रत्यय मंगळवारी तालुक्यातील पालोद येथे आला. सकाळी पालोद येथे एका अंत्यविधीच्या कार्यक्रमात



डॉ. विश्वास पालोदकर यांनी उपस्थित राहून मृताला दोन शब्द बोलून श्रद्धांजली अर्पण केली होती. मात्र, अवघ्या काही तासांनंतर दुपारी काही कामानिमित्त पालोदहून सिल्लोडकडे येत असताना स्वतः डॉक्टरांवरच काळाने झडप घातली. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण पालोद परिसरात मोठी शोककळा पसरली आहे.

**रुग्णसेवेचा 'विश्वास' हरपला:**

गेल्या २५-३० वर्षांपासून डॉ. पालोदकर हे ग्रामीण भागात आपली वैद्यकीय सेवा देत होते. सुरुवातीला आसडी आणि त्यानंतर पालोद येथे त्यांनी स्वतःचे रुग्णालय चालवून सर्वसामान्यांचा आधार बनले होते. आपल्या मृदू आणि मनमिळावू स्वभावामुळे ते संपूर्ण पंचक्रोशीत 'फॅमिली डॉक्टर' म्हणून परिचित होते. त्यांच्या निधनाने ग्रामीण आरोग्य सेवेची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा मोठा परिवार आहे.सिल्लोड-जळगाव महामार्गावर वाहनांच्या वाढत्या वेगामुळे अपघातांचे सत्र वाढले आहे. सोमवार आणि मंगळवार अशा दोन दिवसांत दोन निष्पाप जीवांचा बळी गेल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी पोलिसांनी पिकअप चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, पुढील तपास पोलीस प्रशासन करत आहे.

# रस्ते, वीज व पाणी प्रश्नांवर खासदार संजय देशमुख यांना निवेदन; तात्काळ कार्यवाहीचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील** : मंगरूळनाथ तालुक्यातील विविध प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी दिग्रस येथील लोकप्रिय खासदार संजय देशमुख यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान तालुक्यातील अनेक महत्त्वाचे प्रश्न मांडण्यात आले असून, संबंधित कामे तातडीने मार्गी लावण्यासाठी खासदारांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागांना सूचना देण्याचे आश्वासन दिले.

बैठकीत वनोजा, माळाशेलू, नांदखेडा व तांदळी या गावांमधील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पांदण रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न प्रामुख्याने मांडण्यात आला. या रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना,



विद्यार्थ्यांना तसेच ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. विशेषतः पावसाळ्यात या रस्त्यांची स्थिती अधिकच बिकट होत असून वाहतूक पूर्णपणे विस्कळीत होते. याची गंभीर दखल घेत खासदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ पत्र देऊन या रस्त्यांची दुरुस्ती व मजबुतीकरणाचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात येतील, असे सांगितले.तसेच, वनोजा येथील बजरंग नगर परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून विद्युत खांबांचा अभाव असल्यामुळे नागरिकांना मूलभूत वीजसेवेपासून वंचित राहावे लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच दैनंदिन जीवनावर परिणाम होत असल्याचे सांगण्यात आले. या समस्येची गांभीर्याने दखल घेत Maharashtra State Electricity Distribution Company Limited (महावितरण) विभागाला तात्काळ कार्यवाही करण्यासाठी सूचना देण्यात आल्या असून, संबंधित ठिकाणी लवकरात लवकर विद्युत खांब उभारून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी पत्रही देण्यात आले.

याशिवाय, वनोजा पंचक्रोशीतील धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व असलेल्या (भूर -पूर) येथील प्राचीन महादेव मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावरील धरणाच्या मध्यभागी असलेला अरुंद व धोकादायक रस्ता हा स्थानिकांसाठी मोठा धोका ठरत असल्याची बाबही बैठकीत मांडण्यात आली. या रस्त्यावरून प्रवास करताना अपघात होण्याची शक्यता कायम असल्यामुळे तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. या अनुषंगाने पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्वरित स्थळ पाहणी करून बॅलीगेटसह रस्त्याचे रुंदीकरण व सुरक्षिततेची कामे हाती घ्यावीत, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

तसेच, वनोजा गावातील जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजना अद्याप पूर्णपणे सुरू न झाल्यामुळे नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आणून देण्यात आली. यावर संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने सूचना देण्यात आल्या असून, लवकरच पाणीपुरवठा सुरू होईल, असा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला. या योजनेमुळे गावातील पाणीटंचाई मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.यावेळी तालुका प्रमुख रामदास पाटील सुर्वे,वनोजा येथील डॉ. सुनील राऊत, प्रा. पवन राऊत, संदीप वक्ते पाटील, राजूजी म्हातमारे पाटील तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# जय भवानी महाविद्यालयात नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल ह.भ.प.लक्ष्मण महाराज सस्ते यांचा सत्कार संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुक्यातील बांगरवाडी येथील ह.भ.प.लक्ष्मण महाराज सस्ते यांनी मध्यप्रदेशातील ओंकारेश्वर येथून महासिध्द योगी दादा गुरू भगवान महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली नर्मदा परिक्रमा यात्रा ३६०० कि.मी. पायी प्रवास पूर्ण केल्या बद्दल त्यांचा जय भवानी महाविद्यालयात प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ.विश्वास कदम सर यांच्या शुभ हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते तर व्यासपीठावर कनिष्ठ विभाग




प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे हे होते. प्रस्ताविक प्रा.प्रकाश नाईकवाडे यांनी केले. या वेळी सत्काराला उत्तर देताना ह.भ.प.लक्ष्मण महाराज सस्ते यांनी नर्मदा परिक्रमा यात्रेतील अनुभव सांगुन पुढील काळात दादा गुरु यांच्या मार्गदर्शनाखाली नद्या स्वच्छता करण्यासाठी काम करणार असल्याचे सांगितले. शेवटी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी ह.भ.प.लक्ष्मण महाराज यांनी जो त्याग दाखवला तो खरोखरच महान आहे असे सांगुन त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा.! दिल्या. या सत्कार सोहळ्याचे सुत्रसंचलन प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी केले. तर आभार इतिहास विभाग प्रमुख प्रा. सोमनाथ घाडगे यांनी व्यक्त केले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद व बहुसंख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# रस्त्यावर दहशत माजवणाऱ्या हायवा डंपरांना पोलिसांचा कडक लगाम; चालकांना इशारा

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड पूर्व भागात हायवा डंपरांच्या बेफाम वेगामुळे रस्त्यावर अक्षरशः दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. सलग होत असलेल्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीती आणि संताप वाढत असताना अखेर लासलगाव पोलिसांनी कडक पावले उचलत या बेफाम वाहनांना लगाम घालण्यास सुरुवात केली आहे.

नाशिक–छत्रपती संभाजीनगर महामार्गासह परिसरातील सुरू असलेल्या रस्ते कामांमुळे अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढली आहे. मात्र अनेक हायवा चालक वेगमर्यादा धाब्यावर बसवत बेदरकारपणे वाहन चालवत असल्याने अपघातांचे प्रमाण वाढले होते. परिणामी, सामान्य नागरिकांचा जीव धोक्यात आला होता.या गंभीर पार्श्वभूमीवर लासलगावचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पाटील यांनी तातडीने रस्ते बांधकाम कंत्राटदार व संबंधित यंत्रणांची बैठक घेतली. बैठकीत काम सुरू असलेल्या ठिकाणी सुरक्षा फलक, रिफ्लेक्टर्स आणि इशारा चिन्हे तात्काळ बसवण्याच्या सूचना देण्यात आल्या. विशेषतः रात्रीच्या वेळी



**"पोलीस प्रशासन सर्वतोपरी उपाययोजना करत आहे. मात्र नागरिक आणि वाहनधारकांचे सहकार्य अत्यावश्यक आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कुठलीही तडजोड केली जाणार नाही,"**

**सहाय्यक पोलीस निरीक्षक :-दिपक पाटील**

वाहनधारकांना कामाची पूर्वकल्पना मिळावी यासाठी अतिरिक्त उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले.

तसेच हायवा डंपर चालक व मालक यांना पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला असून, वेगमर्यादा आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यास थेट कठोर कारवाई करण्यात येईल, असे बजावण्यात आले आहे. गरज पडल्यास वाहन जप्ती व गुन्हे दाखल करण्याचीही तयारी पोलिसांनी दर्शवली आहे.या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, पुढील काळात अपघातांची मालिका थांबेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गॅस सिलेंडरच्या घरपोच सेवा देणाऱ्या गाड्या बंद

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे नागरिकांना गॅस सिलेंडर वेळेवर मिळत नाहीत. त्यातच रांगाच्या रांगा या सिलेंडर घेण्यासाठी लागलेल्या दिसून येत आहेत. पनवेल परिसरात गॅस सिलेंडरच्या घरपोच सेवा देणाऱ्या गाड्या देखील बंद झालेल्या आहेत. गावात घरपोच गॅस सिलेंडर देण्यासाठी गाड्या जात नसल्याने नागरिकांना गॅस पुरवठा करणाऱ्या वितरकाकडे जाऊन रिक्षा भाड्याचे पैसे खर्च करून गॅस घ्यावा लागत आहे.गॅसची टंचाई नसल्याचे शासन आणि तालुका स्तरावरील अधिकारी सांगत आहेत. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी असल्याचे दिसत आहे. गॅस घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात रांगा लागलेल्या आहेत. त्यातच पनवेल परिसरातील घरपोच सेवा देणाऱ्या गॅस सिलेंडरच्या गाड्या कित्येक दिवसांपासून गावात येत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे नागरिकांना वितरकाकडे त्यांच्या कार्यालयात जाऊन गॅस सिलेंडर घ्यावा लागतो. नितळस येथील नागरिकांनी पुरवठा विभाग पनवेल यांच्याकडे याबाबत तक्रार केली. याबाबत पुरवठा विभागाला कसल्याही प्रकारची माहिती नाही. पुरवठा विभाग या गाड्या बाबत अनभिज्ञ आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून ही समस्या उद्भवत असली तरी देखील पनवेल पुरवठा विभागाने अद्यापही कोणतीही चौकशी केलेली दिसत नाही.

# उरण नगरपालिकेत तक्रार पेटीचे अनावरण

## उरण तालुका मराठी पत्रकार संघाच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण नगरपालिका हद्दीतील नागरिकांच्या विविध नागरी समस्यांचे वेळेत व पारदर्शक निवारण व्हावे या उद्देशाने नगरपालिका कार्यालयात तक्रार पेटी बसविण्याची मागणी करण्यात आली होती. ही मागणी उरण तालुका मराठी पत्रकार संघ यांच्याकडून नगराध्यक्षा भावना घाणेकर यांना निवेदनाद्वारे करण्यात आली होती. त्या मागणीची दखल घेत आज नगराध्यक्षा भावना घाणेकर यांच्या हस्ते तक्रार पेटीचे अनावरण करण्यात आले.

या उपक्रमामुळे नागरिकांना त्यांच्या समस्या लेखी स्वरूपात थेट प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचा सोपा व पारदर्शक मार्ग उपलब्ध झाला आहे. पत्रकार संघाच्या वतीने या मागणीची पूर्तता केल्याबद्दल नगराध्यक्षा भावना घाणेकर यांचे आभार मानण्यात आले.




यावेळी नगराध्यक्षा भावना घाणेकर यांनी सांगितले की, उरण शहरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबतचे अर्ज, तक्रारी किंवा सूचना नागरिकांनी या पेटीत टाकाव्यात.

प्राप्त तक्रारींची दररोज दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.या कार्यक्रमास नगरसेविका नाहिदा ठाकूर, वंदना पवार, प्रार्थना म्हात्रे, प्रमिला पवार, उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घन:श्याम कडू, उपाध्यक्ष विरेश मोडखरकर आदी उपस्थित होत्या.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी पटकावले अकरा सुवर्ण पदके

### शाळेचे मॅथ्स ऑलिम्पियाड मध्ये घवघवीत यश




**दैनिक युवक आधार**

**(प्रतिनिधी) :-** पाटोदा येथील लिट्ल फ्लॉवर इंग्लिश स्कूल च्या अकरा विद्यार्थ्यांनी मॅथ्स ऑलिम्पियाड दिल्ली येथील अकॅडमी ची गणित विषयाची स्पर्धा परीक्षा मध्ये अकरा मुलांना गोल्ड मेडल्स मिळाले आहेत. या बद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मुलांचा सत्काराचा कार्यक्रम शाळेचे प्राचार्य पठाण सर यांनी आयोजित करून, मुलांना प्रमुख पाहुणे मा.पोलिस निरीक्षक बन्सी आण्णासाहेब जायभाय, प्रसिद्ध उद्योजक श्री अच्युतराव चौरे, सामाजिक कार्यकर्ते वसंत चौरे यांच्या हस्ते मेडल्स, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी ऑलिम्पियाड परीक्षा प्रमुख अर्जुन सानप सर, सौ.उज्वला मॅडम आणि सौ.प्रतिक्षा अर्जुन सानप कार्यक्रमासाठी उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते अर्जुन सानप यांचा ही चांगले मार्गदर्शक म्हणून सत्कार करण्यात आला.

## जागतिक महिला दिनानिमित्त डिजिटल प्रेस क्लब इंडिया द्वारा आयोजित 'डायनॅमिक इंडिया अवॉर्ड – 2026' सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संपादक संतोष आमले :** जागतिक महिला दिनानिमित्त डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया व मातृशक्ती संतोषी फाउंडेशन च्या वतीने आयोजित 'डायनॅमिक इंडिया अवॉर्ड – २०२६' कार्यक्रम मलकापूर येथील भातृ मंडळ येथे आयोजित करण्यात आला सदर कार्यक्रमात महाराष्ट्राचे कानाकोपऱ्यातील आलेल्या विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा सत्कार करण्यात आला .

आंतरराष्ट्रीय मानांकन आयएसओ 9001_2015 प्रमाणित प्रेस क्लब ऑफ इंडिया व मातृशक्ती संतोषी फाउंडेशन च्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव करण्याच्या उद्देशाने व त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी जागतिक महिला दिनानिमित्त चे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी




प्रस्ताव ऑनलाइन मागवण्यात आले होते

त्यावेळी 782 प्रस्तावांपैकी निवड करून 219 मान्यवरांना 'डायनॅमिक इंडिया अवॉर्ड – २०२६' प्रदान करण्यात आला. यामधे शिक्षण क्षेत्रात बहुमूल्य कार्य करणाऱ्या महिला शिक्षक, डॉक्टर, आषा सेविका, परिचारिका, यांना सुद्धा 'डायनॅमिक इंडिया अवॉर्ड – २०२६' देऊन गौरव करण्यात आला.

'डायनॅमिक इंडिया अवॉर्ड – २०२६' वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुनम कुलकर्णी (कृषी सहाय्यक अधिकारी ), कार्यक्रमाचे उद्घाटक धनश्रीताई काटीकर पाटील महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हिंदी मराठी पत्रकार संघ, तर प्रमुख अतिथी अशांतभाई वानखेडे न.प, शिक्षण सभापती, डॉ. सुरेखा जैन तालुका अधिकारी, डॉ. जयश्रीताई खर्चे पॅथॉलॉजिस्ट, डॉ. शारदा झवर, डॉ. मोनिका गोठी, डॉ. अंतिमा गोठी, डॉ. सुषमाताई गोठी, मंगलाताई पाटील काँग्रेस महिला जिल्हाध्यक्ष, प्रा. संगीता अनिल खर्चे इंजिनिअरिंग कॉलेज लायब्ररीन, डॉ. ममता पांडे प्राचार्य हिराबाई संचेती कन्या शाळा, एड. सुवर्णाताई चोपडे, जयश्रीताई बोंबटकार नगरसेविका, डॉ.सौ.सुदीप्ता सरकार प्राचार्य sos, प्रा. अविनाश डाके उपप्राचार्य sos, नेहाताई सदावर्ते संयोजिका मातृशक्ती हे होते

कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व प्रथम महिला संपादक तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.कार्यक्रमात पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक, राजकीय ,कला, वैद्यकीय, उद्योजक, क्रीडा अशा अनेक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तींचा 'डायनॅमिक इंडिया अवॉर्ड – २०२६' देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कविता जाधव मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन रवींद्र गणगे सर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी, श्रीकृष्ण तायडे, प्रा. प्रकाश थाटे, सुधाकर तायडे, प्रमोद हिवराळे, मयूर लड्डा, अमोल वानखेडे, किशोर सोनवणे, प्रदीप इंगळे यांनी परिश्रम घेतले

## सभागृहात शिवरायांच्या राज्याभिषेकावरून वाद; जितेंद्र आव्हाड यांच्या वक्तव्यावरून सत्ताधारी आक्रमक, निलंबनाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका :** धर्मांतर विरोधी विधेयकावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान सभागृहात मोठा वाद निर्माण झाला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासंदर्भात केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यामुळे वातावरण तापले. यानंतर मंत्री शंभूराज देसाई यांनी तीव्र आक्षेप घेत माफीची मागणी केली.

शंभूराज देसाई यांनी सांगितले की, आव्हाड हे विविध संदर्भ देत बोलत असताना त्यांनी शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा उल्लेख करत वादग्रस्त विधान केले. "हे अत्यंत अपमानास्पद असून मी तत्काळ अध्यक्षांकडे आक्षेप नोंदवून त्यांना माफी मागण्यास सांगितले. मात्र आव्हाड सुरुवातीला शब्द मागे घेण्यास तयार नव्हते," असे देसाई यांनी स्पष्ट केले. देसाई यांच्या मते, सभागृहाचे अध्यक्ष वारंवार निर्देश देत असतानाही आव्हाड मोबाईलमध्ये व्यस्त होते आणि त्यांच्या चेहऱ्यावर कोणतेही गांभीर्य दिसत नव्हते. "अध्यक्षांनी कडक शब्दांत सुनावल्यानंतर त्यांनी हातवारे करत दिलगिरी व्यक्त केली. मात्र हे वक्तव्य जाणीवपूर्वक केल्याचे स्पष्ट दिसते," असा आरोप त्यांनी केला. तसेच, गटनेत्यांच्या बैठकीत आव्हाड यांच्या निलंबनाची मागणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.दरम्यान, या प्रकरणावर आमदार योगेश कदम यांनीही कठोर भूमिका घेतली. "आव्हाड यांच्या वक्तव्यांची नोंद आम्ही पाहिलेली नसली तरी त्यांनी माफी मागितल्याने मुद्दा संपत नाही. महाराजांचा अपमान करणाऱ्यांचे निलंबन झालेच पाहिजे," अशी मागणी त्यांनी केली.

याउलट, आमदार अमोल मिटकरी यांनी आव्हाड यांची बाजू मांडत वाद शांत करण्याचा प्रयत्न केला. "डॉ. जितेंद्र आव्हाड हे शाहू-फुले-आंबेडकर विचारांचे आहेत. त्यांनी इतिहासाच्या संदर्भात मत मांडले. त्यांनी शब्द मागे घेतले आणि माफी मागितली असल्याने हा विषय वाढवू नये," असे मिटकरी म्हणाले. तसेच, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर अधिक चर्चा व्हायला हवी होती, असेही त्यांनी नमूद केले.सभागृहात या मुद्द्यावरून निर्माण झालेल्या तणावामुळे काही काळ कामकाज तहकूब करण्यात आले. आता या प्रकरणावर पुढील कारवाई काय होते, तसेच निलंबनाचा निर्णय घेतला जातो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## लाखनीत गुढीपाडव्याला हिंदू नववर्षाचा जल्लोष; १९ मार्चला भव्य शोभायात्रा

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/ लाखनी तालुका प्रतिनिधी :** लाखनी - गुढीपाडवा या हिंदू नववर्षाच्या पवित्र निमित्ताने जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी दक्षिण पीठ, नाणीजधाम जिल्हा सेवा समिती भंडारा यांच्या वतीने लाखनी येथे भव्य हिंदू नववर्ष स्वागत उत्सव व शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शोभायात्रेच्या माध्यमातून गुढीपाडव्याचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दि. १८ मार्च २०२६ ला ओंकार सेलिब्रेशन हॉल, येथे विविध स्पर्धांनी होणार आहे.

यामध्ये भजन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. १९ मार्च २०२६ रोजी सकाळी ७ वाजता लाखनी येथून भव्य शोभायात्रेला सुरुवात होणार आहे.

ही शोभायात्रा ओंकार सेलिब्रेशन हॉल लाखनी येथून मुरमाडी, सावरी, सिंधी लाईन मार्गे पुन्हा ओंकार सेलिब्रेशन हॉल येथे येऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे.

गुढीपाडवा हा हिंदू नववर्षाचा मंगल दिवस असल्याने या उत्सवात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.



## जिजाऊ ब्रिगेड व धारिणी फाउंडेशन च्या वतीने स्त्री शक्ती जागर सन्मान सोहळा सम्पन्न !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/तालुका प्रतिनिधी**

**अकोट :** जिजाऊ ब्रिगेड व धारिणी फॉउंडेशन च्या संयुक्त विधमाने स्थानिक पुष्पाजली मंगल कार्यालय येथे दि.१५ ला जागतिक महिला दिन संपन्न झाला. सर्वप्रथम कार्यक्रमाचे उदघाटन जयश्री दीदी, सीमाताई बोके व प्रमुख मार्गदर्शक यांचेहस्ते दीप प्रज्वलन प्रतिमा पूजन करून झाले.

नगराध्यक्ष मायाताई धुळे,राम मूर्ती वालसिंगे मराठा सेवा संघ तालुका अध्यक्ष, भगत सर, नेहाताई झाडें, प्रा. डॉ. अनिल बाभुळकर, पुष्पाताई पुंडेकर, डॉ. मनीषाताई मते, नयनाताई इंगोले, लताताई चिकटे, नगरसेविका निकिता जुनघरे, शुभांगी टेमझरे,प्रिया मगर ,भैरवी हिंगणकर,डॉ. रुपाली सोनटक्के, प्रा. डॉ. मेघना पोटे यांची कर्यक्रमाला उपस्तित लाभली.

सर्वप्रथम कार्यक्रमाचे उदघाटक,




मार्गदर्शक व प्रमुख अतिथिंचा शाल व श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला सीमा ताई बोके यांनी महिलांना अतिशय समर्पक शब्दात मार्गदर्शन करताना जिजाऊ ब्रिगेडचे कार्य समजावून सांगत असतांना महिलांनी स्वतःचे अस्तिव स्वतः निर्माण करावे. स्वतः मध्ये निर्णय क्षमता असली पाहिजे. महिलांनी अन्धश्रद्धा न बाळगता सर्व गोष्टी डोळस पणे हाताळाव्या.असे मोलाचे मार्गदर्शन केले.पहिले सत्रातील प्रमुख मार्गदर्शक रुपाली नाईक यांनी आजच्या कचरा नको ग बाई या कोर्स च्या माध्यमातून कचऱ्याचे प्रकार,त्याचे वर्गीकरण, पुनर् वापर, पुनर् प्रकिया, खत निर्मिती, वाढता कचरा, कमी कसा करता येईल, यावर सर्वेक्षनातून आकडे देत अभ्यासपूर्ण माहिती दिली. डॉ. मनिषा मते आपल्या भाषणात म्हणाल्या की सर्वांनी सक्रिय सहभाग देत देशाचे, गावचे नागरिक म्हणून आपली जबाबदारीं पार पाडली तर आपला परिसर, मोहल्ला, वॉर्ड, व पूर्ण अकोट शहराला कचरा मुक्त व्हायला जास्त काळ लागणार नाही.

जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने जिजाऊ ची भूमिका साकारणाऱ्या स्वाती गोरे व रामबाईची भूमिका साकारणाऱ्या सीमा आगरे यांचे स्वागत झाले.कार्यशाळेत धारिणी फॉउंडेशन तर्फे कू.चंचल पितांबरवाले, कू.भावना केदार, कू.विजया अस्वार , प्रा.डॉ.सौं.मेघना पोटे,डॉ. सौं. रुपाली स्वप्नील सोनटक्के, सौं.संगीता ढेमरे अकोलीजहागीर,"ग्रामसखी" सौं. आशाताई कदम त्यांचे गटाचे सर्व सदस्य सोनबर्डी या महिला व युवतीचा सन्मान व सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला जिजाऊ ब्रिगेड च्या सुलभा रेळे, अर्चना सावरकर पद्मा हिंगणकर, प्रीती ठाकरे दीपाली पांडे, दीपा वरगे, मोनाली पांडे,जयश्री फोकमारे यांची तरधारिणी फॉउंडेशन च्या सभासद प्रीती पाथ्रीकर,सुषमा मंगळे, मंदा वानखडे, वर्षा मानकर, दीपिका लेबडे,कोकिळा वानरे, शिल्पा वानरे, मंगला दिंडोकार,चाकोते,आशा कदम त्यांचा सर्व ग्रुप सोनबर्डी यांची प्रामुख्याने उपस्थिती दर्शविली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्नेहल अभ्यंकर तर सूत्र संचालन वैशाली बाभुळकर, अर्चना सावरकर यांनी केले.

जिजाऊ ब्रिगेड प्रास्ताविक अंजली ठाकरे जिजाऊ गीत आणि वंदना नेहा पुंडेकर संचालन अपर्णा सावरकर,संगीता ढोरे यांनी केले. अध्यक्षीय भाषण जिजाऊ ब्रिगेड तालुका अध्यक्ष लता ताई चिकटे यांनी केले.

## खुटसावरी येथील समता एकता नगर, नेहरू वॉर्ड क्र. ३ मध्ये साचलेल्या सांडपाण्यामुळे नागरिक त्रस्त; ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया/ भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** भंडारा तालुक्यातील खुटसावरी गावच्या समतानगर वॉर्ड क्र. ३ येथे सांडपाणी साचल्यामुळे नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. परिसरात नाल्यांची योग्य व्यवस्था नसल्याने घरासमोरच सांडपाण्याचे तळे तयार झाले असून त्यात शेवाळ वाढले आहे. त्यामुळे डासांची संख्या वाढून मलेरिया, डेंग्यू सारख्या आजारांचा धोका निर्माण झाला आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत ग्रामपंचायतीकडे अनेकदा तक्रार करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई



करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या निष्क्रियतेबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आरोग्याच्या दृष्टीने गंभीर असलेल्या या समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन नाल्यांची स्वच्छता व सांडपाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## घाटंजी-माणोली रोडवर भीषण अपघात; आकपुरी येथील दोन तरुणांचा मृत्यू !

### मदतीसाठी धावले मुज्जू पटेल आणि उत्कर्ष फाउंडेशन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** घाटंजी-माणोली मार्गावर मंगळवारी (१७ मार्च) रात्री ७ वाजेच्या सुमारास झालेल्या एका भीषण दुचाकी अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाला. गजानन आडे (२६) आणि प्रज्वल कचाडे (२९, रा. आकपुरी) अशी मृत तरुणांची नावे आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, हे दोन्ही तरुण पल्सर गाडीने घाटंजीकडून माणोलीकडे जात होते. माणोली गावाजवळील




वळणावर चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि गाडी विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनावर जाऊन आदळली. हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही तरुण गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी उत्कर्ष फाऊंडेशनच्या रुग्णवाहिकेला आणि मुज्जू पटेल यांना फोन केला. मुज्जू पटेल यांनी आपल्या मित्रमंडळासह तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्वतः रुग्णवाहिका चालवत जखमींना तातडीने घाटंजी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.जखमींची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी यवतमाळच्या शासकीय रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, दुर्दैवाने एकाचा तिथेच मृत्यू झाला. दुसऱ्या तरुणाला तातडीने नागपूरला हलवण्यात आले होते, परंतु आज सकाळी उपचारादरम्यान त्यानेही प्राण सोडले.आमदार राजू तोडसाम यांनी या घटनेची दखल घेत रुग्णालयात संपर्क साधून तातडीने उपचार करण्याच्या सूचना दिल्या होत्या आणि ते सतत परिस्थितीचा पाठपुरावा करत होते. या घटनेमुळे आकपुरी गावावर शोककळा पसरली आहे.

## न्याय द्या नाहीतर मंत्रालय मुंबई येथे उपोषण गजानन गंडाळे यांनी दिले IPS अधिकारी तेजस सारडा यांना दिले निवेदन

**दैनिक युवक आधार**

**उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधि :** दिग्रस पोलिस स्टेशन येथे कार्यरत असलेले पोलिस शिपाई आदित्य जाधव हा पोलिस पोशाखात नसताना खुर्चीवर बसुन टेबल वर पायातील बुटासाह पाय ठेऊन एठीत मोबाईल पाहता पाहता झोपा काढ़त असल्याने अर्जदार गजानन बाबाराव गंडाळे यांनी दिग्रस पोलिस निरीक्षक सह, राज्याचेमुख्यमंत्री, पोलिस महासंचालक,जिल्हाधिकारी यवतमाळ, पोलिस अधीक्षक यवतमाळ, उपविभागीय पोलिस अधिकारी दारव्हा यांना दि.१३.०२.२०२६ रोजी कायदेशीर शिस्तभंगाची कार्यवाही करुण निलंबित करन्यात यावे या साठी तक्रार अर्ज दिले होते परंतु कोनत्याही प्रकारची कार्यवाही न झाल्यामुळे संतप्त अर्जदार यांनी थेट मंत्रालय मुंबई या



ठिकानी उपोषण करण्याचा दिला ईशारा पोलिसप्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित प्रकरणांवर तातडीने कारवाई करण्यात यावी,या मागणीसाठी दि,१६.०३.२०२६ रोजी पोलिस निरीक्षक IPS अधिकारी तेजस सारडा यांना निवेदन देण्यात आले.

सदर निवेदनामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे की,अनेक वेळा तक्रारी करूनही पोलिस प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याने सामान्य नागरिकांना न्याय मिळत नसल्याची भावना निर्माण झाली आहे.यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आणि असंतोष वाढत आहे.प्रशासनाने तात्काळ संबंधित प्रकरणांची चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी,अन्यथा हा विषय आणखी तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.जर प्रशासनाने वेळेत योग्य ती कारवाई केली नाही, तर मुंबई येथील मंत्रालयासमोर उपोषण आंदोलन छेडण्यात येईल,असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.या निवेदनामुळे स्थानिक प्रशासनात एकच खळबळ उडाली असून आता पोलिस प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## गॅस सिलेंडरचा काळाबाजार करू नका अन्यथा कारवाई तहसीलदार अभिजीत जगताप यांचा इशारा

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर( प्रतिनिधी) सय्यद ईसा** : आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या युध्दजन्य परिस्थितीचा गैरफायदा घेत घरगुती एलपीजी गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी माहूर तहसील प्रशासन सतर्क झाले असून माहूर तालुक्यातील सर्व हॉटेल, रेस्टॉरंट, भोजनालय, चहा कॅन्टीन यांच्या तपासण्या सुरु सुरू करण्यात आले असून हॉटेल्स मध्ये व्यवसायीक सिलेंडरच वापरावे घरगुती सिलेंडर वापरू नये अशा सक्त सूचना तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाद्वारे देण्यात येत आहेत

तालुक्यातील गॅस एजन्सीज यांना कोणत्याही व्यावसायिक आस्थापनेला घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा करू नये. तसेच काळाबाजार होणार नाही याची दक्षता घ्यावी. आणि ऑनलाईन ओ टी पी द्वारे घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा ग्राहकांना करण्यात यावा. या कामामध्ये हलगर्जीपणा आढळून आल्यास जीवनावश्यक वस्तू कायदा 1955 नुसार आपलेवर योग्य ती कारवाई करण्यात येऊन गुन्हा नोंदविण्यात येईल अशा सूचना महसूल प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत तहसीलदार अभीजित जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश राऊत निरिक्षण अधिकारी गजेंद्र मिरजगावे पुरवठा निरीक्षक संतोष पहुरकर पुरवठा लिपिक श्रीमती पूनम मांडवगडे पुरवठा लिपिक हे सर्व हॉटेल्स वर जाऊन ऑनलाईन ओटीपी द्वारे गॅस सिलेंडर प्राप्त करून घ्यावे. काही अडचणी असल्यास संबंधित गॅस एजन्सीज यांचेशी संपर्क साधावा.तालुक्यात घरगुती एलपीजी गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा पूर्णपणे सुरळीत सुरू आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवून घाबरून जाऊन अनावश्यक साठेबाजी करू नये. असे आवाहन करीत आहेत



**गॅस सिलिंडरचा काळाबाजार, अवैध साठवणूक तसेच गैरवापर यावर प्रभावी आळा घालण्यासाठी प्रशासनाकडून विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून नागरिकांनी याबाबत सतर्क राहून सहकार्य करावे.**

**अभिजीत जगताप**
**तहसीलदार तहसील कार्यालय माहूर.**

## नागपूर विद्यापीठाच्या महिला खेळाडूंसोबत धावत्या रेल्वेत छेडछाड

### भारतीय जनता युवती मोर्चाचा तीव्र निषेध, क्रीडा संचालकांकडून कारवाईचे आश्वासन

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी**

**राहुल मडावी/नागपूर** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महिला कराटे खेळाडूंवर 'फलकनुमा एक्सप्रेस'मध्ये झालेल्या छेडछाडीच्या घटनेने संपूर्ण क्रीडा क्षेत्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेची गंभीर दखल घेत भाजप शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांच्या सूचनेनुसार व भारतीय जनता युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे यांच्या मार्गदर्शनात, युवती प्रमुख प्रशंसा भोयर यांनी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. संभाजी भोसले यांना निवेदन सादर करून दोषींवर कडक कारवाई करण्याची आणि भविष्यात खेळाडूंच्या सुरक्षेसाठी कडक नियमावली बनविण्याची मागणी केली. यावर डॉ. संभाजी भोसले यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून योग्य पावले उचलण्याचे व खेळाडूंच्या सुरक्षेसाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.नागपूर विद्यापीठाचा १०-१२ मुलींचा कराटे संघ ओडिशामधील बालासोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी रवाना झाला होता. रविवारी सकाळी भुवनेश्वर रेल्वे



स्थानकावरून बालासोरकडे जाण्यासाठी या मुलींनी 'फलकनुमा एक्सप्रेस' (गाडी क्रमांक १२७०४) पकडली. दुर्दैवाने, विद्यापीठ प्रशासनाच्या नियोजनाअभावी महिला व पुरुष प्रशिक्षक दुसऱ्या बोगीमध्ये होते आणि खेळाडू मुली वेगवेगळ्या डब्यांमध्ये विखुरलेले होते. याच संधीचा फायदा घेत काही उनाड तरुणांच्या टोळक्याने या खेळाडू मुलींची छेड काढली, त्यांच्यावर अत्यंत अश्लाघ्य भाषेत शेरेबाजी केली आणि अश्लील वर्तन केले. अत्यंत घाबरलेल्या अवस्थेत या मुलींनी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी व्हिडिओ बनवून आपल्या पालकांना पाठवला, तेव्हा हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला.या संदर्भात भारतीय जनता युवा मोर्चातर्फे रेल्वे प्रशासनालाही निवेदन देण्यात आले असून दोषींवर कठोर कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. "पीडित विद्यार्थिनी नागपूर विद्यापीठाच्या खेळाडू असल्याने त्यांच्या सुरक्षेची प्राथमिक जबाबदारी विद्यापीठाची आहे," असे मत प्रशंसा भोयर यांनी व्यक्त केले. रेल्वेत मुलींची छेडछाड करणाऱ्या तरुणांवर कठोर कारवाई करण्यासाठी विद्यापीठाने रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करावा.राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावरील संघ प्रवासाला निघताना विद्यार्थिनी व प्रशिक्षक यांना एकाच डब्यामध्ये आरक्षण मिळावे, ही व्यवस्था कायमस्वरूपी लागू करावी जेणेकरून भविष्यात अशा घटना टाळता येतील. या घटनेमुळे खेळाडू आणि पालकांमध्ये निर्माण झालेली भीती दूर करण्यासाठी विद्यापीठाने चौकशी समिती नेमून ठोस उपाययोजना कराव्यात.भविष्यात खेळाडूंना अशा प्रकारचा कुठलाही त्रास होऊ नये यासाठी विद्यापीठाने तात्काळ पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी भाजयुमोच्या वतीने करण्यात आली.क्रीडा संचालक डॉ . संभाजी भोसले यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे ऐकून घेतले व विद्यापीठ या प्रकरणात विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, रेल्वे प्रशासनाशी संपर्क साधून दोषींवर कारवाई करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे आश्वस्त केले.यावेळी युवती मोर्चाच्या अनुश्री कापसे,श्रद्धा धवळे,मोनाली चुटे,मुस्कान शाहू,प्रबोधिनी गायकवाड,श्रुती धोळे,भाग्यश्री महाडिक,रश्मी श्रीवास,आरुषी सिंगांधुपे,पल्लवी गिरोले,मीनल गहलोत,कल्याणी कुबडे इत्यादी उपस्थित होते.

## जंगली डुकराचा थरार! भानपूर गावात धुमाकूळ; ३ वासरे ठार

### उपसरपंच योगेश पतेह यांची जखमींची भेट; वनविभागाकडे मदतीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया तहसीलच्या भानपूर गावात 8 मार्चच्या रात्री जंगली डुकराने अक्षरशः थैमान घातले. रात्रीच्या अंधारात गावात शिरलेल्या या डुकराने घराघरात घुसून जनावरांवर हल्ला केला, ज्यामध्ये ३ वासरे ठार तर २ गायी जखमी झाल्या. तसेच, एका ग्रामस्थावर झडप घालून त्याला गंभीर जखमी केले आहे.घटनेची माहिती मिळताच भानपूरचे उपसरपंच योगेश पतेह यांनी तत्परता दाखवत जखमी ग्रामस्थाची रुग्णालयात जाऊन भेट घेतली व प्रकृतीची विचारपूस केली. डुकराने केवळ जनावरांचेच नव्हे, तर घरातील अन्नधान्याचेही मोठे नुकसान केले आहे.उपसरपंच योगेश पतेह यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून या हिंस्र डुकराचा तात्काळ बंदोबस्त करण्याची आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. सध्या गावात प्रचंड भीतीचे वातावरण असून, वनविभागाने ठोस पावले उचलावीत, असा सूर उमटत आहे.




## रब्बी हंगामातील सहायक स्तरावरील ई-पीक पाहणी नोंदणीस ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : रब्बी हंगाम २०२५-२६ साठी सुरू असलेल्या सहायक स्तरावरून करावयाच्या ई-पीक पाहणी नोंदणीला ३१ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली.महाराष्ट्र विधानसभा नियम ४७ अंतर्गत केलेल्या निवेदनात मंत्री बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यात सध्या डिजिटल क्रॉप सर्व्हे या ॲपच्या माध्यमातून ई पीक पाहणी नोंदणी होते. राज्यात रब्बी हंगाम २०२५-२६ अंतर्गत १० डिसेंबर २०२५ ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत शेतकरी स्तरावरून पीक नोंदणी सुरू होती. मात्र, पीक पाहणी क्षेत्रापैकी आतापर्यंत केवळ ५५.६९ टक्के इतक्या क्षेत्राची पीक नोंदणी पूर्ण झाली आहे. मात्र, सध्याच्या प्रगतीचा वेग लक्षात घेता ही प्रक्रिया वेळेत पूर्ण होणे शक्य नाही. पीक नोंदणी न झाल्याने नैसर्गिक आपत्ती, पीक विमा, पीक कर्ज इ. लाभापासून कोणताही शेतकरी वंचित राहू नये, यासाठी सहायक स्तरावरून करावयाच्या पीक नोंदणीला ३१ मार्च २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले.रब्बी हंगामातील ई-पीक पाहणी नोंदणी १०० टक्के पूर्ण करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्याचेही मंत्री बावनकुळे यांनी सांगितले.

## "कुलूप तोडून घरात प्रवेश", "चोरट्यांच्या हाती काही लागले नाही"सणसर गावात चोरीचा प्रयत्न फसला

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील सणसर गावातील बाजारपेठेत मंगळवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केला. मुस्तफा सय्यद व जकीर सय्यद यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करण्यात आला लोखंडी कपाट उघडून सर्व सामान अस्ताव्यस्त करून चोरी करण्याचा प्रयत्न केला तरी मात्र चोरट्यांच्या हाती काहीही लागले नाही,त्यामुळे चोरी अयशस्वी ठरली. या घटनेनंतर तातडीने वालचंदनगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील तपास पोलीस कर्मचारी करत आहेत. गावातील बाजारपेठेत घडलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.स्थानिक नागरिकांनी रात्रीच्या वेळी गस्त वाढवावी,तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावे असे आवाहन सहा.पोलीस



निरीक्षक राजकुमार डूणगे यांनी नागरिकांना केले आहे पोलिसांनीही गावात सतर्कता वाढवून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

## महागाव तहसील कार्यालयात जागतिक ग्राहक दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशेमहागाव : (यवतमाळ)** : तहसील कार्यालय, महागाव येथे जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन ग्राहक संरक्षण व जनजागृतीच्या उद्देशाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष परिविक्षाधिन तहसीलदार रोहित शिंदे तसेच प्रमूख पाहुणे सौ सुनीता विभुते, मोहन कोल्हे निरीक्षण अधिकारी, गजानन पराते नायब तहसीलदार, वैभव पवार नायब तहसीलदार, रवी वाघमारे,विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी ग्राहक हक्क, कर्तव्ये तसेच फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ग्राहकांनी



वस्तू खरेदी करताना बिल घेणे, दर्जेदार वस्तूंची निवड करणे आणि कोणतीही तक्रार असल्यास संबंधित विभागाकडे नोंद करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले.तसेच ग्राहक संरक्षण कायद्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठीचे उपाय यावरही उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी ग्राहक हक्कांचे संरक्षण करण्याची शपथ घेतली.

या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये ग्राहक हक्कांविषयी जागरूकता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाला पुरवठा विभागाचे लखन चव्हाण ,रामा बनसोडे, अमोल कनवाळे ,रमेश आकोसकर, प्रफुल खंदारे व रास्त भाव धान्य दुकानदार उपस्थित होते.

जागरूक ग्राहक काळाची गरज आहे.

सुनिता विभुते

आधुनिक बाजारपेठेत ग्राहकांची फसवणूक

प्रमाण वाढले आहे. ग्राहक हा अर्थव्यवस्थेचा

केंद्रबिंदु असला तरी निकृष्ट दर्जाच्या वस्तु

दिशाभूल करणाऱ्या जाहिराती ,लपवलेले नियम ऑनलाईन व्यवहारातील फसवणूक यामुळे ग्राहकाना आपल्या हक्काबदल जागृत राहणे अनिवार्य झाले आहे.

## संतांच्या चरणी खरे सुख आहे - ह.भ.प.श्रीहरि पितळे महाराज

### वै.ह.भ.प. गुरुवर्य बापूसाहेब महाराज वालुरकर यांचा ३४ वा पुण्यतिथी उत्सव

**दैनिक युवक आधार**

**सेलू/प्रतिनिधी शिवाजी पवार** : संतसंगतीमुळे आत्मिक सुख आणि ईश्वरभक्तीची गोडी लागते.संतांचे आचरण शुद्ध असते व ते समाजाला योग्य दिशा दाखवतात.संत म्हणजे नैतिक मूल्ये,अढळ ईश्वरभक्ती व माणुसकीची सेवा करणारे थोर पुरुष असतातअसे प्रतिपादन संत बाळाभाऊ महाराज पितळे नरसिंह संस्थानचे (मेहकर) ह.भ.प.श्रीहरि पितळे महाराज यांनी केले.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखी रथामागे दिंडी क्रमांक १५ चे मालक वै.ह.भ.प.गुरुवर्य बापूसाहेब महाराज वालुरकर यांच्या ३४ व्या पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने आयोजित कीर्तनात ते बोलत होते.शहरातील समता नगर भागात हा पुण्यतिथी उत्सव (दिनांक१७ मार्च) पार पडला.श्री



संतांचिया माथा चरणांवरी ।
साष्टांग हे करी दंडवत ।

जगद्गुरू तुकाराम महाराज यांचा हा अभंग सेवेसाठी निवडला.

पुढे बोलताना पितळे महाराज म्हणाले की,संतांच्या चरणावर माथा ठेवून त्यांना साष्टांग प्रणिपात करावा. त्यांच्या चरणांचा आश्रय घेतल्यामुळे विश्रांती अर्थात शांतता मिळते. त्यांच्या बोधामृत वाणीने मनात चैतन्य व निवांतपणा येतो.तुमच्याकडून कोणतीही सेवा घडताही पूर्वपुण्याचे फळ केवळ त्यांच्या सहवासामुळे प्राप्त होते. श्रुती संपन्नता व ब्रम्हनिष्ठता याबरोबरच कृपाळुपणा हा संतांचा महत्वाचा गुण असतो.संत नेहमी कृपेचा वर्षाव करतात. ज्यांचा अभाव कोणत्याही काळी सिद्ध होत नाही अशी जी चैतन्यस्वरूप व्यक्ती असते तिलाच संत म्हणतात.

निष्काम सेवेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे वै.ह.भ.प.गुरुवर्य बापूसाहेब महाराज वालुरकर आहेत. वारकऱ्यांसाठी सकारात्मक ऊर्जेचा स्रोत तसेच शिष्यांच्या प्रगतीसाठी तळमळणारे संयमी थोर पुरुष होते.संत तोची जगी ।क्षमा दया ज्याच्या अंगी ।असे व्यक्तित्व त्यांचे होते. त्यांच्या कीर्तनात भक्तीची गोडी व ज्ञानाची खोली व समाज प्रबोधनाचा संदेश असायचा. संत बाळाभाऊ महाराज पितळे व वै. ह.भ.प.अण्णासाहेब महाराज वालुरकर यांच्या अध्यात्मिक कार्याचा व भेटीचा प्रसंग त्यांनी सांगितला.पुण्यतिथी सोहळ्यासाठी फडातील वारकरी व भाविकांची उपस्थिती होती.

## जाचकवस्ती गावात दैनिक युवक आधारच्या बातमीचा दणका : वीजपुरवठा सुरळीत

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील जाचकवस्ती गावात भारनियमनाशिवाय वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी होती.उन्हाळ्याच्या कडाक्याच्या दिवसांत नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्यामुळे सरपंच महेश निंबाळकर, माजी उपसरपंच विक्रम भैय्या निंबाळकर,सुनील निंबाळकर,हनुमंत जामदार, किरण गायकवाड,ग्रामसेवक संदीप सोडमिसे आणि ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या सणसर उपविभाग कार्यालयातील उपअभियंता मा. बोरनाळ साहेब यांना निवेदन दिले होते. निवेदनानंतर तात्काळ कारवाई करत अखंडित होत असणारा वीजपुरवठा दुरुस्त करण्यात आला. या कामगिरीबद्दल उपअभियंता बोरनाळ साहेब व सूर्यवंशी साहेब यांचे ग्रामस्थांनी आभार मानले.

दैनिक युवक आधारने या समस्येवर ठळकपणे बातमी प्रसिद्ध केल्यानंतर प्रशासनाने तातडीने लक्ष घातले. सरपंच महेश काका निंबाळकर, माजी उपसरपंच विक्रम भैय्या निंबाळकर, शिवसेना




इंदापूर वैद्यकीय तालुका अध्यक्ष सुनील निंबाळकर, किरण गायकवाड, जेष्ठ नागरिक हनुमंत जामदार व ग्रामसेवक संदीप सोडमिसे यांनी दैनिक युवक आधारचे विशेष आभार मानले.

## धमक्यांवरून विधानपरिषदेत खळबळ : अंबादास दानवे प्रकरणी सरकारवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/ विदर्भ संपादिका** : विधानपरिषदेत आज विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांना मिळालेल्या जीवे मारण्याच्या धमक्यांवरून मोठी खळबळ उडाली. "मारून टाकू, कापून टाकू" अशा गंभीर स्वरूपाच्या धमक्या मिळूनही सरकारकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करत आमदार अनिल परब यांनी हा मुद्दा सभागृहात जोरदारपणे उपस्थित केला.



अनिल परब यांनी सरकारवर निशाणा साधताना म्हटले की, दानवे यांनी अधिकृत निवेदन देऊनही प्रशासन निष्क्रिय आहे. "सरकार गोळी चालण्याची वाट पाहत आहे का?" असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, "ज्यांना गरज नाही अशा लोकांना पोलीस संरक्षण दिले जाते, मात्र प्रत्यक्ष धोका असलेल्या व्यक्तीकडे दुर्लक्ष केले जाते," अशी टीकाही त्यांनी केली.यावेळी त्यांनी सरकारकडून तातडीने भूमिका स्पष्ट करण्याची मागणी करत, "संध्याकाळपर्यंत यावर अधिकृत निवेदन द्यावे," अशी आग्रही मागणी केली.

दरम्यान, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर यांनी या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना सांगितले की, "एसआयडीसीच्या (SIDC) अहवालानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल." मात्र, या उत्तरावर विरोधक समाधानी नसल्याचे दिसून आले.

या प्रकरणामुळे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, सरकारची भूमिका काय असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जागतिक ग्राहक दिनानिमित्त निफाड तहसीलमध्ये ग्राहक जनजागृती कार्यक्रम

### ग्राहक हक्क व जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन; विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड येथे तहसील कार्यालय व ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ मार्च २०२६ रोजी जागतिक ग्राहक दिनानिमित्त ग्राहक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुरवठा निरीक्षक अतुल गायकवाड होते. यावेळी महाराष्ट्र ग्राहक पंचायत, निफाड तालुका संघटक किरण जोशी यांनी ग्राहकांनी स्वतः प्रामाणिक राहून व्यवहार केल्यास शासन फसवणुकीविरोधात न्याय मिळवून देऊ शकते, असे सांगत ग्राहक संरक्षण कायद्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनीही जागतिक ग्राहक दिनाचे महत्त्व अधोरेखित करत ग्राहकांनी आपल्या हक्कांबरोबरच जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवणे आवश्यक असल्याचे सांगितले.

नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष वसंत दंडवते यांनी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता केली.

यावेळी तहसीलदार विशाल नाईकवाडे, तालुका पुरवठा अधिकारी उल्हास टर्ले, दुय्यम निबंधक जगताप मॅडम, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार, निफाड येथील पोलीस कर्मचारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.तसेच निफाड तालुका ग्राहक पंचायत सचिव डॉ. सौ. सीमा डेर्ले, सहसंघटक नारायण पिंपळे, प्रवासी महासंघाचे सदस्य विजय पाटील, प्रसिद्धी प्रमुख संतोष सोनवणे, आशाताई पाडाळकर, स्वस्त धान्य दुकानदार व त्यांचे पदाधिकारी तसेच ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिजाऊंचे संस्कार आणि शिवरायांचे विचारांनी पेटली तरुणाई; मानोऱ्यात निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त जल्लोष!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे /वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मानोरा (वाशिम)छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मानोरा येथील मातोश्री सुभद्राबाई पाटील कला, विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालयात "राजमाता जिजाऊंचे संस्कार, शिवरायांचे विचार" या विषयावर आयोजित निबंध स्पर्धेला विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. अनुभव शिक्षा केंद्र वाशिमच्या वतीने घेण्यात आलेल्या या स्पर्धेत युवक-युवतींनी उत्साहाने सहभाग नोंदवत आपल्या लेखणीतून इतिहासातील प्रेरणादायी विचार जिवंत केले.




दि. १३ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या बक्षीस वितरण सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. स्पर्धेत प्रथम क्रमांक शिवानी गणेश सोनवणे हिने पटकावला, तर द्वितीय क्रमांक स्नेहा बंडू डापसे आणि तृतीय क्रमांक चंदना किशोर मनवर यांनी मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. एन. एस. ठाकरे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून स्नेहल कदम (अध्यक्ष, क्षितिज फाउंडेशन), डॉ. हर्षा काळे, आर. एस. नक्षीने मॅडम, अतुल राऊत, रोशन चव्हाण, किशोर कोपरकर (राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी) व एस. एन. ढवळे मॅडम यांची उपस्थिती लाभली. मान्यवरांनी विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके व प्रमाणपत्रे देऊन त्यांचा उत्साह दुणावला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आशिष धोंगडे (जिल्हा प्रशिक्षक, अनुभव शिक्षा केंद्र अमरावती-वाशिम) यांनी विशेष पुढाकार घेतला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारांचे आणि शिवरायांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित करत प्रेरणादायी मते मांडली.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाबद्दलची आवड वाढत असून, जिजाऊंचे संस्कार आणि शिवरायांचे विचार अंगीकारण्याची प्रेरणा मिळत असल्याचे मान्यवरांनी सांगितले. भविष्यात अशा उपक्रमांचे आयोजन अधिक व्यापक स्वरूपात करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

## नवोदयमध्ये सिल्लोडचा डंका; ९ विद्यार्थ्यांची भरारी

### 'प्रवेश वाढवा' अभियानाला यशाची गुढी; जिल्ह्यात सर्वाधिक निकाल

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :-** "गुढीपाडवा, प्रवेश वाढवा" या राज्यव्यापी अभियानाचा सिल्लोड तालुक्यात दिमाखात शुभारंभ झाला असून, जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेच्या निकालाने या अभियानाला यशाची गुढी लाभली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्वाधिक निकाल देण्याचा मान यंदा सिल्लोड तालुक्याने पटकावला असून, तालुक्यातील ८ जिल्हा परिषद शाळांमधील ९ विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना 'सीबीएसई' (CBSE) धर्तीवर दर्जेदार आणि मोफत शिक्षण मिळण्यासाठी केंद्र शासनामार्फत नवोदय विद्यालये चालवली जातात. या संधीचे सोने करत जिल्हा परिषद शाळांच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेचा झेंडा फडकावला आहे.




**यशस्वी विद्यार्थी:**

भक्ती फकीरबा बांबर्डे (केऱ्हाळा), अर्णव चंद्रकांत सिसोदे (केऱ्हाळा), कल्याणी संदीप सुरडकर (पिंपरी), आराध्या प्रशांत पगारे (अन्वी), सावित्री गोपाल पांढरे (काजीपूर), प्रज्ञा सुनील वाकेकर (वाघेरा), प्रियांका भगवान बैनाडे (सोनाप्पावडी), आर्यन तुकाराम मेंडके (घटांब्री) आणि रोहन सरदार जोनवाळ (खोरावाडी).

या दैदिप्यमान यशाबद्दल पंचायत समितीच्या सभापती अनिताताई सुरेश बनकर, उपसभापती भगवान आहेर, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, गटशिक्षणाधिकारी रमेश ठाकूर, विस्तार अधिकारी राजू फुसे, गटसमन्वयक रामचंद्र मोरे यांच्यासह तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विषयतज्ज्ञांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. या निकालामुळे 'प्रवेश वाढवा' अभियानाला मोठी गती मिळणार असल्याचा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.

# शिक्षणाच्या माध्यमातून महिलांना स्वतःचे करिअर घडवता येते - सौ. मिनाक्षी भोसले

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/मारुती सत्रे** ; आष्टा हरिनारायण (गहिनीनाथ पाचबैल) महिलांचे शिक्षण हे वैयक्तिक प्रगतीसाठी नाही तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या हितासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असून शिक्षणामुळे महिला आत्मनिर्भर आणि आत्मविश्वासपूर्ण बनतात गरीबी कमी होते आरोग्य सुधारते आणि महिला शिक्षणामुळे ज्ञानाबरोबरच सुसंस्कृत पिढी निर्माण होते त्यामुळे समाज आणि महिलांनी शिक्षणाचे महत्त्व जाणून घेऊन महिलांनी शिक्षणाच्या माध्यमातून करीअर घडवण्याचे आवाहन सौ. मिनाक्षी भोसले मॅडम यांनी केले.

आष्टी तालुक्यातील पिंप्री, रूटी, भोसले वस्ती ग्रामपंचायत अंतर्गत रुटी, भोसले वस्ती पोलीस पाटील पदाची नुकतीच निवड झाली असून येथील शेतकरी कुटुंबातील सौ. रेश्मा विठ्ठल सुळे ह्या येथील पोलीस पाटील पदी नियुक्त झाल्या असुन मंगळवार दिनांक



१७/३ /२०२६ त्यांच्या निवडीबद्दल आदर्श शेतकरी तथा शिक्षक राजेंद्र भोसले सर, सौ. मिनाक्षी भोसले मॅडम व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाला विठ्ठल जनार्धन सुळे जनार्धन सुळे, डॉ. भागवत सुळे, सौ.लिलाबाई सुळे, सौ. सारीका सुळे आदी मान्यवर उपस्थित

यावेळी कार्यक्रमाला संबोधीत करताना सौ. मिनाक्षी भोसले मॅडम म्हणाल्या की, आज प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. महिलांना प्रत्येक क्षेत्रात आरक्षण असुन गाव, तालुका, जिल्हा, राज्य आणि राष्ट्राच्या जडणघडणीत महिलांचे मोठे योगदान असून महिलांनी चुल आणि मुल ही जुनी परंपरा मोडीत काढली आहे परंतू आजही समाजातील काही मंडळी स्त्री कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलेला नाही त्यामुळे त्या परिवाराच्या आर्थिक, आरोग्यदायी, शैक्षणिक आणि सुसंस्कृत पिढी घडवण्यात अपयशी ठरत असुन त्याविरुद्ध ज्या घरात महिला शिक्षित आहे तेथील घरात सुसंस्कृत पिढी घडताना पहायला मिळत आहे. तसेच येथील विठ्ठल जनार्धन सुळे यांना व त्यांच्या परिवाराने सौ. रेश्मा सुळे यांच्यावर विश्वास दाखवून शिक्षणाच्या माध्यमातून त्यांचे करीअर घडवण्याचे काम केले असून त्यांची पुढील पिढी नक्कीच आरोग्यदायी, ऐश्वर्य संपन्न व सुसंस्कृत घडवण्यासाठी फायदा होणार असल्याचे मत व्यक्त केले. तसेच शिक्षणाला वयाची अट नसुन शिक्षणाच्या माध्यमातून कधीही जिवनात बदल घडवू शकतो कारण प्रचंड जिद्द आणि परिश्रम केले तर यश हे नक्कीच मिळत असतं ह्याच उदाहरण म्हणजे रेश्मा सुळे या आहेत लग्न होऊनही परिवाराचा घाडा सांभाळत त्यांनी ते शक्य करून दाखवलं आहे.

**परिवाराने दाखवलेल्या विश्वासामुळे यश संपादन केले - सौ. रेश्मा विठ्ठल सुळे**

**महिला शिक्षणामुळे आज सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि धार्मिक क्षेत्रात काम करत आहे परंतू त्यासाठी त्या परिवारातील सदस्यांनी त्या स्त्री वर ठेवलेला विश्वास महत्वाचा असतो कारण परिवाराची साथ आणि शाबासकीची थाप मिळाली तर कोणतीही महिला कुठेही न डगमगता जे अशक्य वाटते ते शक्य करू शकते ते माझ्या बाबतीत घडले असून माझ्या आई, वडील, सासु सासरे व परीसरातील सदस्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासामुळे हे यश संपादन केले आहे.**

## केक नको, झाड लावा!" — आमदार अमित भाऊ झनक यांचे अनोखे आवाहन; वाढदिवस होणार 'हरित संकल्पाचा उत्सव'

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड मालेगाव मतदारसंघाचे कार्यसम्राट, युवा व जनतेचे लाडके आमदार अमित भाऊ झनक यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त एक अनोखे आणि प्रेरणादायी आवाहन करत समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. दरवर्षीप्रमाणे केक, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू स्वीकारण्याऐवजी यावर्षी त्यांनी आपल्या सर्व कार्यकर्ते, मित्रपरिवार आणि नागरिकांना "झाडाचे रोपटे" भेट म्हणून आणण्याचे आवाहन केले आहे.

आमदार झनक यांनी आपल्या भावनिक संदेशात सांगितले की, "तुमचे प्रेम आणि शुभेच्छा हीच माझ्यासाठी सर्वात मोठी भेट आहे. मात्र, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन छोटासा प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे यावर्षी केक आणि पुष्पगुच्छ न आणता एक झाडाचे रोपटे घेऊन या."

त्यांच्या या अभिनव संकल्पनेमुळे वाढदिवसाचा आनंद फक्त साजरा न होता, पर्यावरण संवर्धनाचा संदेशही समाजात पोहोचणार आहे. "हरित वाढदिवस" या संकल्पनेतून एक सकारात्मक बदल घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न नागरिकांमध्येही उत्साह निर्माण करत आहे.

या उपक्रमामुळे मतदारसंघात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होण्याची शक्यता असून, पर्यावरण संरक्षणासाठी एक मजबूत पाऊल उचलले जाणार आहे. आमदार झनक यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून स्वागत होत असून, त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले जात आहे.



**"माझ्या प्रत्येक कार्यकर्त्याने आणि मित्राने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. हा केवळ वाढदिवस साजरा करण्याचा कार्यक्रम नसून, आपल्या पुढील पिढ्यांसाठी हिरवागार भविष्य घडवण्याचा संकल्प आहे. तुमचा सहभाग आणि प्रयत्न हाच माझ्यासाठी सर्वात मोठा सन्मान असेल."**

**— आमदार अमित भाऊ झनक**

# आम्ही जनतेचे सेवक; तहसिलदार भरत सुर्यवंशी

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पेदेगलूर** : छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-२ अंतर्गत हणेगाव येथे घेण्यात आला असून या माध्यमातून आम्ही जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी रोजगार हमी योजना,श्रावण बाळ योजना,घरकुल योजना,पुरवठा विभाग,पशुवैदयकिय विभाग,प्राथमिक आरोग्य केंद्र,सेतू सुविधा केंद्र,आपले सरकार,शैक्षणिक विभाग अशा अनेक स्टॉल याठिकाणी आपण उभारल्या असून जनतेच्या प्रलंबित प्रकरणाचं निराकरण करण्यासाठी या स्टॉलचा फायदा होईल व जनतेने आपली जे काही तक्रारी आहेत या स्टॉलच्या माध्यमातून तक्रारी अर्ज दाखल करण्यात यावे असे आवाहन देगलूर तहसिलचे तहसिलदार भरत सुर्यवंशी यांनी केले आहे तर यावेळी उपस्थित असलेल्या या भागातील ग्रामस्थांना सांगितले की,आम्ही जनतेचे सेवक आहोत,आपल्या अर्जाची दखल घेतली जाईल असेही त्यांनी सांगितले.या कार्यक्रमाची सुरुवात "भारत माता की जय" अशा जयघोषाने झाली. देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेच्या प्रांगणात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियानांतर्गत अभियान टप्पा-२ अंतर्गत दि.१४ मार्च २०२६ रोज शनिवारी सकाळी दहा वाजता या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून हा समाधान शिबीर उत्साहात साजरा करण्यात आला.या शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन करून व आलेल्या मान्यवर व प्रमुख पाहुण्यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात करण्यात आला




असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देगलूर उपविभागीय अधिकारी अनुप पाटील होते तर या कार्यक्रमाचे मार्गदर्शक देगलूर तहसिलचे तहसिलदार भरत सुर्यवंशी होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महसूल विभागाचे नायब तहसिलदार गणेश रायवार यांनी केले तर पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार सौ.वैशालीताई गंदिगुडे,पंचायत समितीचे गटविकास अधिकारी श्रीकांत बळदे,पशु वैद्यकिय अधिकारी,विस्तार अधिकारी बालाजी उमाटे,कृषी अधिकारी एस.टि.कावठवाड,पाणीपुरवठा अधिकारी जाधवर व अन्य विभागातील अधिकारी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला प्रमुख पाहूणे म्हणून भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रितम बाळसाहेब देशमुख,ग्रामपंचायत सरपंच सौ.शारदादेवी राठोड, प्राचार्य शंकरराव राठोड, ग्रामपंचायत उपसरपंच मुजीपोदिन चमकुडे,ग्रामपंचायत सदस्य दिलीप बंदखडके, ग्रामपंचायत सदस्य विवेक पडकंठवार,शिवसेना(उबाठा) तालूकाध्यक्ष बालाजी इंगळे पाटील,हणमारेड्डी वासरे बिजलवाडी सरपंच,बालाजी चोपडे खुतमापूर सरपंच,नारायण बिरादार रमतापूर सरपंच,नंदकुमार वलकले माजी सरपंच खुतमापूर,पत्रकार किशोर आडेकर,पत्रकार उमाकांत पंचगल्ले,पत्रकार प्रल्हाद नाईकवाडे,रास्त भाव दुकानदार,अंगणवाडी सेविका, आशा वर्कर व या भागातील प्रतिष्ठीत नागरिक,शेतकरी बांधव,महिला वर्ग,अनेक लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबीरामध्ये सातबाऱ्यावरील भुविकास बँकेच्या कर्जाचा बोजा कमी करून लाभार्थ्याला कोरा सातबाऱ्याचे वाटप करण्यात आले असून जमीन अभिलेख अद्ययावतीकरण सरकारी योजनांचा लाभ,जमीनीचे उतारे, फेरफार,नामांतरण वारसा नोंद, प्रलंबित अर्ज,महसुल तक्रारी, सातबाऱ्यावरील नावांची दुरुस्ती करून अनेक लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले आहे. हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी हणेगाव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक अमोल जाधव,मंडळ अधिकारी लक्ष्मण बेंजलवार तलाठी महेश पदाजी व सर्व गावातील तलाठी,कोतवाल यांनी अथक परिश्रम घेतले.

# वसुधा फाउंडेशन; जागतिक महिला दिनानिमित्त "ती" चा सन्मान प्रमाणपत्र देऊन केला साजरा



वसुधा फाउंडेशन ची स्थापना होऊन आता दोन वर्षे पूर्ण होत आली. वसुधा फाउंडेशन हे नाव दिलेल आहे आणि त्या नावाला साजेस माझं काम चालूच आहे. गेले 35 वर्ष मी शैक्षणिक सेवा केली. शिक्षण क्षेत्रात असताना वर्गातल्याच पाच-सहा मुलांना दत्तक घ्यायच आणि त्यांचा खर्च करायचा अशी मुलं घ्यायची की एखाद्याचे आई-वडील दोघेही नसतील किंवा एक सिंगल पेरेंट्स असतील किंवा खूप गरीब परिस्थिती असेल अशी मुलं आपल्या वर्गातील निवडायची आणि त्यांचा वर्षभराचा खर्च करायचा कारण माझे एवढा पगार नव्हता की मी सर्व मुलांचा खर्च करीन. मी माझ्या हातात काय मिळत होतं त्यातला दहा टक्के वाटा तरी मी ह्या मुलांसाठी खर्च करत असेल. अजूनही माझं हे काम चालूच आहे अनाथ आश्रम,वृद्धाश्रम, समाजातील तळागाळातील लोकांना साडी वाटप,ड्रेस वाटप, त्यांना बालगीत शिकवणे, बडबड गीते शिकवणे,काव्य संमेलनातून काव्य कसे करायचे हे पण आम्ही शिकवतो. त्याचबरोबर "रमाची पाटी" ही माझी शॉर्ट फिल्म सुद्धा आम्ही दाखवतो आणि त्यातून मुलांना काय घेण्यासारखे आहे हे त्यांचे शिक्षक उत्तम सांगतात.आणि मग मुलांकडूनच ऍक्टिव्हिटी कशा करून घ्यायच्या,काय, काय करता येते?शनिवार म्हणजे दप्तर मुक्त शाळा तर ह्या शनिवारी आपण कोण कोणते उपक्रम घेऊ शकतो हे सर्व वसुधा फाउंडेशनची टीम आम्ही सर्व मिळून हेच काम करत असतो.समाजसेवेचे व्रत हाती घेतले ते कधी सोडणार नाही.

हा समाज रुपी समाजसेवेचा लढा माझी मी एकटीच करत असते आता मात्र माझ्याकडे माझी वसुधा फाउंडेशनची टीम खंबीरपणे पाठशी उभी आहे त्यामध्ये कोमल, शीतल, श्रेया,योगेश, गौरव, तुषार, सायली,मयुरी,घडे सर, काकडे सर, प्रमोद ही नाव प्रामुख्याने मला घ्यावी वाटतात.मला मधुसूदन घाणेकर सरांनी सुद्धा खूप मदत केलेली आहे कोणतेही कार्यक्रम घ्यायचे म्हणलं तर आम्ही सर्व मिळून पहिली चर्चा करत असतो.प्रिया, सारिका,भारती, दीपा या सुद्धा माझ्या मैत्रिणी आहेत आणि वेळोवेळी आम्ही एकमेकांचा सल्ला घेऊन कार्य करत असतो.

वसुधा फाउंडेशन आपण समूह तयार केला परंतु या समूहात एक चार-पाच जण सोडले तर जास्त कोणीही सहभाग घेताना दिसत नाही स्पर्धा असेल तरच फक्त आपण सहभाग घेतो असे मला दिसून आले पण मी **ती** चा सन्मान करायचा असं माझ्या टीम तर्फे ठरवलं तेव्हा माझ्या असं लक्षात आलं की माझ्यासमूहामध्ये अनेक वेगळ्या क्षेत्रातील महिला, असमान्य व्यक्तिमत्व असणाऱ्या महिला आहेत की ज्यांचा परिचय मला आत्तापर्यंत झालेलाच नव्हता तर या परिचय मागण्यामागे एकच मनात होतं की आपण आपल्या समूहात नेमकं कोण आहे आणि काय करतय हे तरी आपल्याला समजायला हवं तर आपण सर्वांनी मला जी उत्तम साथ दिली त्याबद्दल मी आपले मनःपूर्वक आभार मानते आणि आपल्याला सन्मानपत्र आनंदाने बहाल करते. आपल्याला ते आवडले असेल असे मला वाटते तर याबद्दल कोणाला बोलायचे असेल तर निश्चित आपण बोलू शकता मनःपूर्वक धन्यवाद थँक्यू!

योगेशने मनापासून आपल्याला ही प्रमाणपत्र बनवुन दिली त्या बद्दल त्याचे मनःपूर्वक धन्यवाद नाही म्हणणार... पण खूप कौतुक करते..

जवळजवळ 200 प्रमाणपत्र आम्ही समूहात दिली.जागतिक महिला दिन उत्तम साजरा झाला. वसुधाला सर्वांचे उत्तम अभिप्राय देखील आले. मनःपूर्वक धन्यवाद वसुधा फौंडेशन मधील सर्व कर्तृत्ववान महिलांना..

**आपलीच वसुधा...**
**निवृत्त शिक्षिका, कवयित्री,**
**लेखिका, समाजसेविका, पत्रकार**

## गॅस वितरण क्रेदावर ग्राहकांनी गर्दी करू नये OTP प्रणाली द्वारे गॅस लवकर वितरित होणार–नगरसेविका सिताताई पाटील

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** आखाती देशात युद्धा मुळे व्यावसायिक गॅस बंद केल्यानंतर अनेक हॉटेल छोट्या उद्योगांना त्यांचा फटका बसल्यानंतर आता घरगुती गॅस ग्राहक घाबरून जाऊन गॅस वितरीत होण्याची वाट न बघता विविध गॅस वितरण केंद्राबाहेर गॅस घेण्यासाठी रांगा लावू लागले आहेत अनेक ठिकाणी काळा बाजार होऊ लागल्याने शासनाने आता OTP प्रणाली द्वारे गॅस वितरण करण्याचा निर्णय घेतला आहे त्यामुळे नंबर लावल्यानंतर 96 तासात गॅस वितरण होणार आहे त्यामुळे ग्राहकांनी उन्हात उभे राहून आपले हाल करून घेऊ नये असे आवाहन खांदा कॉलनीत नगरसेविका सिताताई पाटील यांनी खांदा कॉलनी येथे गॅस वितरण क्रेदाला भेट दिल्यानंतर केले आपल्याला गॅस मिळाला



नाही तर तशी तक्रार वरिष्ठ कार्यालयाकडे करावी तसे फोन नंबर प्रकाशित करण्यात आले आहेत घाबरून जाऊन नागरिकांनी आपले हाल करून घेऊ नये असे आवाहन नगरसेविका सिताताई पाटील यांनी केले आहे

## हरी ओम फुड्स कंपनी मुंबई यांचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड हे गाव गर्भागिरी पर्वताच्या पायथ्याशी वसलेले आहे. या गावाला थोर संतांची परंपरा लाभलेली आहे. देऊळगाव घाट या गावातील मोगदरा हे ठिकाण, गर्भगिरी पर्वतातील एक ठिकाण आहे. या भागात गावरान गुरांची संख्या खूप जास्त असल्यामुळे, या ठिकाणी पाणी नसल्यामुळे, ही पाणपोही चालू करण्यात आली. बीड जिल्ह्यातील पहिली जनावरांची पाणपोई हरी ओम फुट्स कंपनी मुंबई यांच्यातर्फे चालू करण्यात आली आहे.



बीड जिल्ह्यातील उष्णतेची तीव्रता दिवसेंदिवसवाढत असताना माणसांसोबतच मुक्या जनावरांनाही पाण्याची मोठी गरज भासत आहे. अशा कठीण काळात देऊळगाव घाट येथे "हरी ओम फुड्स कंपनी मुंबई यांच्या तर्फे जनावरांसाठी पहिली पाणपोई बाबासाहेब आसाराम ठोंबरे यांच्या माध्यमातून सुरू करण्यात आली असून, हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. दिवसाला शंभर ते दीडशे गाई गुरे पानपोई वरती पाणी पिण्यासाठी जात आहेत. उन्हाळ्यात रस्त्याने फिरणारी जनावरे, गुरेढोरे, पक्षी आणि इतर मुक्या जीवांना पाण्याअभावी त्रास सहन करावा लागतो. ही गरज ओळखून "हरी ओम फुड्स" संस्थेने देऊळगाव घाट येथे जनावरांसाठी स्वच्छ आणि सतत पाणी उपलब्ध करून देणारी पाणपोई उभारली आहे. या उपक्रमामुळे परिसरातील जनावरांना मोठा दिलासा मिळत असून ग्रामस्थांकडूनही या कामाचे कौतुक केले जात आहे. समाजामध्ये दया, करुणा आणि पर्यावरण संवर्धनाची भावना जपणारा हा उपक्रम खरोखरच अनुकरणीय आहे. "मुक्या जीवांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा" या भावनेतून सुरू झालेली ही पाणपोई बीड जिल्ह्यातील एक आदर्श सामाजिक उपक्रम ठरत आहे. अशा प्रकारचे उपक्रम इतर गावांनीही पुढे येऊन राबवावेत, हीच अपेक्षा. हरी ओम फुड्स तर्फे सुरू झालेला हा उपक्रम मानवतेला सुंदर संदेश देणारा आहे. या पाणपोई मुळे बाबासाहेब आसाराम ठोंबरे यांचा साधेपणात मोठेपणा दिसून आला.

## नशाबंदी मंडळासाठी अभिमानाची बाब

### अमोल मडामे यांची राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या मुख्य समन्वयकपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित आठवे राज्यस्तरीय व्यसनमुक्ती साहित्य संमेलन तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार 2026 या महत्त्वपूर्ण कार्यक्रमासाठी नशाबंदी मंडळ, महाराष्ट्र राज्यचे मुख्य संघटक-चिटणीस अमोल स. भा. मडामे यांची मुख्य समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीमुळे नशाबंदी मंडळाच्या कार्याचा राज्यस्तरावर गौरव झाला असून ही मंडळासाठी अत्यंत अभिमानाची बाब मानली जात आहे. व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात



सातत्याने कार्यरत असलेल्या मडामे यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम अधिक प्रभावीपणे पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.मुंबई येथे २५ व २६ मार्च २०२६ रोजी हा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

व्यसनमुक्तीबाबत जनजागृती, साहित्यिक चर्चा तसेच उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा गौरव अशा विविध उपक्रमांचा या कार्यक्रमात समावेश असणार आहे. अमोल मडामे यांच्या या निवडीमुळे नशाबंदी मंडळाच्या कार्याला नवी दिशा मिळणार असून, त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी; निफाडमध्ये ३६ गावांत संजीवनी प्रकल्प सुरू

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी** : निफाड तालुक्यात नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (टप्पा २.०) अंतर्गत ३६ गावांची निवड करण्यात आली असून प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासन व जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविण्यात येणारा हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी ठरत आहे. पात्र लाभार्थ्यांनी प्रकल्पाच्या अधिकृत पोर्टलवर जाऊन अर्ज करावेत, असे आवाहन निफाड तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार यांनी केले आहे.हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत व हवामान अनुकूल शेतीस चालना देणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर, पाण्याचा कार्यक्षम वापर, जमिनीची सुपीकता वाढविणे, कर्ब उत्सर्जन कमी करून कर्बग्रहण वाढविणे यावर भर देण्यात येणार आहे. तसेच शेतकरी गट व महिला बचत गटांना पूरक व्यवसायासाठी मार्गदर्शन व अर्थसहाय्यही दिले जाणार आहे. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांसाठी विविध घटकांवर आकर्षक अनुदान उपलब्ध आहे. पाच हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचनासाठी ७५ ते ८० टक्के, वैयक्तिक शेततळ्यास १०० टक्के, शेततळे अस्तरीकरणासाठी ५० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. याशिवाय विहीर पुनर्भरण, फळबाग लागवड, वृक्ष लागवड, बांबू लागवड, पाईप व पंप संच, रेशीम उद्योग, शेळीपालन, मत्स्यपालन, गांडूळ खत युनिट, नाडेप कंपोस्ट, बियाणे उत्पादन तसेच शेडनेट व हरितगृह उभारणीसाठीही सहाय्य मिळणार आहे.सामूहिक योजनांअंतर्गत शेतकरी उत्पादक संघटना, शेतकरी गट व महिला बचत गटांसाठी कृषिमाल साठवणुकीसाठी गोदाम उभारणीस २४ लाखांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. तसेच कृषि प्रक्रिया उद्योग व मूल्य साखळी बळकटीकरणासाठी ६० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य उपलब्ध राहणार आहे.या प्रकल्पामुळे निफाड तालुक्यातील शेती अधिक सक्षम, टिकाऊ व हवामान बदलास प्रतिकारक्षम होण्यास मोठी मदत होईल, असा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी विलंब न करता ऑनलाईन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गुढीपाडवा : नवचैतन्य, स्वाभिमान आणि नवसंस्कृतीचा उत्सव



भारतीय संस्कृतीत सण-उत्सव हे केवळ आनंदाचे क्षण नसतात; ते समाजाच्या इतिहासाचे, परंपरेचे आणि सामूहिक भावनांचे प्रतीक असतात. प्रत्येक सणामागे एखादी प्रेरणा, एखादा ऐतिहासिक संदर्भ आणि जीवनाला दिशा देणारा संदेश दडलेला असतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात अत्यंत महत्त्वाचे स्थान असलेला सण म्हणजे गुडीपाड्वा. हा दिवस केवळ नवीन वर्षाचा प्रारंभ नाही, तर नवचैतन्य, नवउमेद आणि नव्या आशेचा आरंभ आहे. वसंत ऋतूच्या आगमनासोबत येणारा गुढीपाडवा हा सण भारतीय संस्कृतीच्या जीवनदायी परंपरेचे प्रतीक आहे. निसर्गात जशी नवपालवी फुटते, तशीच नव्या वर्षाची सुरुवात जीवनात नवीन संधी, नवीन विचार आणि नवीन ऊर्जा घेऊन येते. म्हणूनच गुढीपाडवा हा केवळ धार्मिक सण नाही; तो आशावाद, पुनरुत्थान आणि सकारात्मकतेचा उत्सव आहे.

भारतीय पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला नवीन वर्षाची सुरुवात होते. याच दिवशी महाराष्ट्रात गुढीपाडवा साजरा केला जातो. हा दिवस उगड़ी म्हणून आंध्र प्रदेश आणि कर्नाटकात साजरा होतो, तर उत्तर भारतात याच काळात चैत्र नवरात्री सुरू होते. यातून भारतीय संस्कृतीची एक महत्त्वाची वैशिष्ट्य दिसते, भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधतेतूनही एकात्मतेची भावना. भारताच्या विविध भागात नाव वेगवेगळी असली तरी नववर्षाचे स्वागत करण्यामागची भावना एकच आहे नवीन सुरुवात, नव्या आशा आणि नव्या शक्यता. गुढीपाडव्याच्या दिवशी घराच्या प्रवेशद्वारावर उभारली जाणारी गुढी ही विजय, समृद्धी आणि स्वाभिमानाचे प्रतीक मानली जाते. बांबूच्या काठीवर रेशमी वस्त्र, साखरेची गाठी, कडुलिंबाची पाने आणि वर तांब्याचा किंवा चांदीचा कलश लावून गुढी उभारली जाते. ही गुढी केवळ धार्मिक परंपरा नाही; ती विजयाचा आणि सकारात्मकतेचा ध्वज आहे. घराच्या दाराशी उभारलेली गुढी जणू सांगत असते, अडचणी कितीही असल्या तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा.

गुढीपाडव्याशी अनेक ऐतिहासिक आणि सांस्कृतिक संदर्भ जोडलेले आहेत. काही परंपरांनुसार हा दिवस इतिहासकारांच्या मते शिवाजी यांच्या विजयाचे प्रतीक म्हणूनही गुढी उभारली जाते. या संदर्भांचा अर्थ इतकाच गुढी म्हणजे विजयाचा ध्वज. अन्याय, पराभव किंवा संकटावर मात करून उभे राहण्याची प्रेरणा या सणातून मिळते. गुढीपाडवा हा सण निसर्गाशीही अतूटपणे जोडलेला आहे. चैत्र महिन्यात निसर्गात नव्या पालवीचे आगमन होते. झाडांना नवी पाने फुटतात, फुलांचा सुगंध दरवळतो, वातावरणात ताजेपणा भरतो. हा निसर्गाचा संदेश आहे, जीवनात कितीही कठीण काळ आला तरी नव्या सुरुवातीची संधी नेहमी असते. म्हणूनच गुढीपाडवा हा निसर्गाशी एकरूप होऊन नव्या जीवनाचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. सण हे समाजाला एकत्र आणण्याचे माध्यम असतात. गुढीपाडव्याच्या दिवशी लोक एकमेकांना भेटतात, शुभेच्छा देतात, आनंद वाटून घेतात.

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणसांमधील संवाद कमी होत चालला आहे. तंत्रज्ञानाने अंतर कमी केले असले तरी मनांमधील दुरावा वाढत आहे. अशा वेळी गुढीपाडवा आपल्याला स्मरण करून देतो, समाजाचा खरा आधार म्हणजे परस्परांचे नाते आणि विश्वास. आजचा काळ वेगवान बदलांचा आहे. तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जीवनशैली झपाट्याने बदलत आहे. या बदलांच्या प्रवाहात अनेकदा आपली सांस्कृतिक परंपरा मागे पडताना दिसते. सण-उत्सव अनेकदा केवळ औपचारिकतेपुरते मर्यादित राहतात. परंपरेचा अर्थ न समजता केवळ विधी पार पाडले जातात. मात्र गुढीपाडवा आपल्याला सांगतो, सण साजरा करण्याचा खरा अर्थ म्हणजे जीवनात सकारात्मकता, मूल्ये आणि सांस्कृतिक अभिमान जपणे.

गुढीपाडवा म्हणजे केवळ शुभेच्छा देण्याचा दिवस नाही; तो नवीन संकल्प करण्याचा दिवस आहे. समाज म्हणून आपण स्वतःला प्रश्न विचारायला हवा, आपण अधिक संवेदनशील समाज घडवत आहोत का? आपण सामाजिक समतेच्या दिशेने पावले टाकत आहोत का? आपण पर्यावरणाचे रक्षण करत आहोत का? नवीन वर्षाचा खरा अर्थ म्हणजे केवळ कालगणनेचा बदल नाही, तर विचारांचा आणि कृतीचा बदल. जागतिकीकरणाच्या या युगात अनेक संस्कृती एकमेकांशी मिसळत आहेत. हे सकारात्मक असले तरी आपल्या संस्कृतीची ओळख जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे. गुढीपाडवा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा सण आहे. या सणातून आपली परंपरा, आपले मूल्य आणि आपली सांस्कृतिक ओळख जपली जाते. गुढीपाडवा हा सण आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देतो,

जीवनात कितीही संकटे आली तरी आशेचा ध्वज उंच ठेवावा. गुढी म्हणजे विजयाचे प्रतीक, नववर्ष म्हणजे नव्या संधींचा प्रारंभ आणि हा सण म्हणजे जीवनाकडे सकारात्मकतेने पाहण्याची प्रेरणा.आजच्या बदलत्या काळात गुढीपाडव्याचा खरा अर्थ समजून घेतला तर हा सण केवळ परंपरा राहणार नाही; तो समाजाला दिशा देणारा प्रेरणादायी उत्सव ठरेल. नवीन वर्ष आपल्यासाठी प्रगती, समता, आनंद आणि समृद्धी घेऊन येवो, समाजात बंधुभाव वाढो आणि प्रत्येकाच्या आयुष्यात नवचैतन्य फुलो, हीच या मंगल दिनी अपेक्षा. गुढीपाडव्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



प्रवीण बागड़े